# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०५/०६/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०५/०६/२००८ रोजी सभा सुचना क्र. ०३ दि. ३०/०५/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ७) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| १०) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ११) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १२) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १३) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १४) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १५) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बालाजी खतगावकर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ३) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ४) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ५) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ६) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ७) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ८) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| ९) | डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १०) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| ११) | श्री. भारत जगताप | -- | सहा. नगररचनाकार |
| १२) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १३) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १४) | श्री. राज घरत | -- | सिस्टीम ॲनालीस्ट, नागरी सुविधा केंद्र |
| १५) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| १६) | श्री. सोनारे | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| १७) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| १८) | श्री. स्वप्नील सावंत | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| २) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ३) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी व कर्मचारी वर्ग आपले सर्वांचे मी हार्दिक स्वागत करुन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सहकार्य करावे अशी मी सर्वांना विनंती करतो. आणि सचिवांनी सभेला सुरुवात करावी असे मी विनंती करतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, दि. १०/०१/२००८ व दि. २४/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. ६ वर सेंटरला माझे वक्तव्य आहे. हे जे प्रोसिडींग लिहीतात ना त्यात केवढ्या मिस्टेक आहेत. आता हे इतिवृत्तांत बघा. साहेब आपण ठाणे टी.एम.सी. ला काम करुन आलात आमच्या मा. महासभेचे विषय किती असतात. तसेच स्थायी समितीचे विषय किती असतात? तुम्हांला माहित आहे का? सांगा नाहीतर मी सांगतो आणि तेवढ्याचे ते लोक इतिवृत्तांत करुन देतात. ते लोक करुन देतात म्हणजे काय करुन देतात. साहेब कितीतरी मिस्टेक आहेत. आपण १०-१०, १५-१५ पान तुम्ही घाई घाईत करतात. केवढ्या ग्रॅमेटिकल मिस्टेक आहेत. मी पुढे भरपूर वाचलेले आहे. तुम्ही तुमच्या ह्यांना समज द्या. हे बरोबर नाही. म्हणजे एखाद्या शब्दाच्या हो नाही वर पूर्ण डेफिनेशन चेंज होतो. ठराव मंजूर झाला नाही झाला आहे नाही एवढंच आहे. त्यानंतर पान नं. ७ मध्ये ही जी काही रुलिंग दिलेली आहे. ती यादी अजून मिळालेली नाही. बालाजी खतगांवकर साहेबांचे वक्तव्य आहे. तुम्ही त्याच्यावर आदेश दिलेला आहे की रुलिंग देण्यात यावी म्हणून आपण अस काय ठरले होते की मिटींग झाली की त्या मिटींगमध्ये जी रुलिंग होतात समजा, आता एखादा ठराव तुमचा कायम वाचून केला गेला. ती रुलिंग तुमची लगेच गेली पाहिजे.

**नगरसचिव :-**

ह्या मिटींगची केली आहे. ह्या मिनिट्सची केलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

पूर्वी आपण करत नव्हतो आपण अंडरस्टॅण्डींग ने ते ते विभागप्रमुख त्याची ॲक्शन करत होते. आता सचिवांनी प्रत्येक सभेचे रुलिंग त्या विभागाला आपण कळवितो.

**मिलन म्हात्रे :-**

ते आता सगळं अंडरच असते. स्टॅण्डींग कोणच नसते.

**नगरसचिव :-**

ह्या मिनिटसचे केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कुठे आहे? कॉपी द्या ना.

**नगरसचिव :-**

ह्या दोन्ही मिनिट्सचे केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आता डिपार्टमेंटचे कोण कोण आले ते बघा. प्रभाग अधिकारी आले का? सचिवांनी स्थायी समितीच्या प्रत्येक सभेला इतिवृत्तांत द्यावे. सेक्युरिटी महिला युनिफॉर्म घालत नसतात. त्यांना युनिफॉर्म घालायला सांगावे. आता युनिफॉर्म करण्यासाठी तुम्ही कोणाला सुचना दिल्या. सभागृहाला दिल्या...

**शरद पाटील :-**

सगळे प्रभाग अधिकारी आले का?

**मिलन म्हात्रे :-**

युनिफॉर्म घालण्याकरिता सुचना दिल्या. आता सिक्युरिटी गार्डचा आपला काही संबंध नाही. तुम्ही तुमच्या ठेकेदाराला सुचना दिल्या पाहिजे.

**नगरसचिव :-**

आस्थापना मार्फत सुचना दिल्या जातात.

**मिलन म्हात्रे :-**

आस्थापनाने तुमच्या सिक्युरिटीचा जो ठेकेदार आहे. त्याला युनिफॉर्म घालायला अमुक तारखेला सुचना दिल्या. असे क्लिअर पाहिजे ना. तुमची दि. १०/०१/०८ ची सभा आहे की दि. २४/०१/०८ ची सभा आहे.मग येथे कुठल्या सभेचे कुठले रुलिंग तेच कळत नाही.

**नगरसचिव :-**

दि. १०/०१/०८ च्या सभेचे रुलिंग आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही २४/०१/०८ कशाला टाकली?

**नगरसचिव :-**

दि. २४/०१/०८ चे औषधाचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कळायला काहीच नाही. इकडे २४ टाकले.

**नगरसचिव :-**

दि. १०/०१/०८ आणि दि. २४/०१/०८ असे.

**शरद पाटील :-**

सगळे प्रभाग अधिकारी आले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सचिव साहेब ह्याच्यामध्ये काम करा की अनुक्रमांक मा. सभापती साहेबांनी दिलेली रुलिंग १,२,३,४ आणि संबंधित डिपार्टमेंट आणि त्यांनी ते कार्यवाही केल्याचे...

**मिलन म्हात्रे :-**

आणि डिपार्टमेंटने परत कोणाला दिले आता समजा कॉन्ट्रॅक्टर आहे. त्याचे काम चालू आहे. बांधकाम विभाग आहे. तुम्ही सिटी इंजिनियरला आदेश केले. सिटी इंजिनियर ने कन्सल्टिंग जो कोण ठेकेदार आहे किंवा जी कोणाची एजन्सी आहे. त्याला दिले आणि किती तारखेला त्याला तुम्ही आदेश दिले ते क्लिअर आले पाहिजे ना. सचिव साहेब ते काही कळत नाही. फेरनिविदा काढण्यात याव्यात.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब प्रभाग अधिका-यांना बोलवले की नाही.

**नगरसचिव :-**

बोलवले आहे.

**शरद पाटील :-**

सगळे कुठे आहे?

**नयना म्हात्रे :-**

प्रभाग अधिकारी आहेत कुठे?

**शरद पाटील :-**

तुम्ही त्यांना पहिला बोलवून घ्या नंतर सभा चालवा.

**नयना म्हात्रे :-**

त्यांना असे वाटत नाही का की स्थायी समिती सभा आहे तर त्या सभेला जावे म्हणून.

**शरद पाटील :-**

मिटींगला येत नाही म्हणजे काय? मग आम्ही कशाला मिटींगला अकरा वाजता यायचे.

**नयना म्हात्रे :-**

हेमंत पाटील कुठे बाहेर गेले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हेमंत पाटील उपकराच्या ट्रेनिंगला बाहेर गेलेले आहेत.

**शरद पाटील :-**

स्वप्नील सावंत कुठे आहे?

**नयना म्हात्रे :-**

येथे एवढे नाले सफाईचे काम चालू आहे आणि प्रभाग अधिकारी मस्त इकडे तिकडे जातात म्हणजे ह्याचा अर्थ काय?

**मिलन म्हात्रे :-**

ही दुसरी मिटींग झाली. मागच्या वेळेला सुद्धा असेच झालं होतं.

**मा. सभापती :-**

परवा खास लेटर दिले.

**मिलन म्हात्रे :-**

लेटर दिले म्हणजे आपली शोकांतिका आहे. तुम्हांला खरोखर सांगतो की मा. सभापती साहेबांची जरब अशी पाहिजे. साहेब आम्ही त्या मिटींग चालवल्या आहेत.

**मा. सभापती :-**

आपण नाही चालवायची. मी नाही चालवत, चला आता.

**मिलन म्हात्रे :-**

मिटींग चालली नाही त्यांना काही फरक पडत नाही आपण कार्यवाही काय करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा जे अधिकारी आले नाही. त्याची उपस्थिती घेतली जाईल आणि नियमानुसार...

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून मी सचिवांना बोलतो की ह्याच्यामध्ये अधिका-यांची सुद्धा प्रेजेन्टी अपसेन्टी लागली पाहिजे. साहेब आम्ही नगरसेवक आहोत मा. सभापती साहेबांची पण उपस्थिती लागते आणि अधिका-यांची उपस्थिती

नाही लागत. सुरुवातीला त्या अधिकाऱ्यांच्या सुद्धा प्रेजेन्ट्या लागल्या पाहिजे. इतिवृत्तांची कॉपी आहेत. कोण अधिकारी गैरहजर हजर हे सगळं आहे. नंतर हे हळूच बंद केले. उपस्थिती अनुपस्थिती ही सगळी बंधन आम्हांला..

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब किती वेळा बोलायचे. प्रभाग अधिकारी उपस्थित व्हायला पाहिजे. कन्सलटन्ट डिपार्टमेंटचे एच.ओ.डी. हजर राहिले पाहिजे. किती वेळा सांगायचे. प्रत्येक मिटींगमध्ये तेच सांगत रहायचे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जे अधिकारी अनुपस्थित असतील. त्यांच्यावर कार्यवाही होईल आणि आपल्याकडे प्रस्ताव सादर केला जाईल.

**मा. सभापती :-**

कमिशनर साहेबांना मी स्वतःहून लेटर दिलेले आहे. की आम्हांला सर्व अधिकारी उपस्थित पाहिजे. आज जे उपस्थित नसतील त्यांच्यावर मी कार्यवाही करायला लावणार?

**एस. ए. खान :-**

साहेब मागे पण असेच झाले होते. पण आता कार्यवाही झाली नाही म्हणून आज पण असंच...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्यावेळेला अधिकारी नव्हते म्हणून सभा तहकूब केली होती. आज पुन्हा तीच गोष्ट असेल. एकदा कमिशनर साहेबांना तरी येवू द्या मग बघू ते ह्याच्यावर काय निर्णय घेतात.

**एस. ए. खान :-**

साहेब माझी अशी मागणी आहे की सभा अर्धा तास तहकूब करा आणि त्यांना येवू द्या मग मिटींग चालू करु. प्रभाग अधिकारी आणि कन्सल्टंट डिपार्टमेंटचे एच.ओ.डी. हजर नाही. म्हणून अर्धा तास ही सभा तहकूब करण्यात येत. असे तुम्ही रेकॉर्डवरती घ्या. मा. सभापती साहेब जर नगरसेवकांना सभेमध्ये यायचे नसते तर ते पत्र देतात की गैरहजर आहे आणि हे येथे काहीच रिपोर्ट देत नाही की गैरहजर आहे कुठे गेले? काय करायला गेले काहीच नाही. मा. महासभेमध्ये नगरसेवक गैरहजर राहतात तर नगरसचिवांना पत्र देतात की आज मी गैरहजर आहे आणि सचिव ते पत्र वाचतात येथे त्यांची काही रिपोर्टींग नाही. कुठे गेले? फिरायला गेले?

**मा. सभापती :-**

साडे अकरा वाजले आहेत. आपण अर्धा तासासाठी मिटींग तहकूब करतो. १२.०० वा. मिटींग ही पुन्हा चालू करु.

**सभा तहकूब झाल्याची वेळ :- ११.३० वा.**

**सभा सुरू झाल्याची वेळ :- १२.०० वा.**

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अजित पाटील, कर निर्धारक व संकलक श्री. श्रीकांत मोरे मुख्यलेखाधिकारी, श्री. शिवाजी बारकुंड, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा, श्री. शरद बेलवटे लेखाअधिकारी, श्री. दिपक खांबित कार्यकारी अभियंता, श्री. क्लासो फर्नाडिस अग्निशमन विभाग, श्री. संजय दोंदे प्रभाग अधिकारी, डॉ. लहाने वैद्यकीय आरोग्य विभाग, श्री. नरेंद्र पाटील भांडार विभाग, श्री. जगताप नगररचना विभाग, श्री. संदीप शिंदे आरोग्य विभाग, श्री. राजकूमार कांबळे आरोग्य विभाग, श्री. राज घरत सी.एफ.सी., श्री. नरेंद्र चव्हाण जनसंपर्क अधिकारी, श्री. सोनार प्रशासन अधिकारी, श्री. संजय तायशेटे परवाना विभाग, श्री. स्वप्नील सावंत प्रभाग अधिकारी, अनुउपस्थित अधिकाऱ्यांची नावे अशी आहेत. श्री. विजय पाटील परिवहन विभाग, श्री. गणेश पाटील प्रभाग अधिकारी, श्री. मनोहर म्हात्रे

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग अधिकारी नंबर किती?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रभाग अधिकारी क्र. ४ श्री. मनोहर म्हात्रे जाहिरात विभाग, श्री. गोविंद परब आस्थापना सामान्य प्रशासन, चारुशीला खरपडे, आस्थापना विभाग, श्री. हेमंत पाटील मा. आयुक्त यांच्या परवानगीने बाहेर प्रशिक्षणाला गेले. श्री. बाबूराव वाघ वाहन विभाग, श्रीम. सई वडके विधी अधिकारी, श्री. सुनिल यादव चौकशी अधिकारी, श्री. हरेश्वर भोईर नगरभवन, श्री. सुनिल काळे जन्म मृत्यू विभाग, श्री. रामचंद्र असोदेकर महिला व बालकल्याण विभाग, अनुउपस्थित अधिकाऱ्यांची यादी आणि मा. आयुक्त साहेबांची परवानगी घेवून जे बाहेर असतील ते स्वतः प्रशासकीय लेवलवर तपासली जाईल. कमिटीच्या सुचनेप्रमाणे...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वृक्षप्राधिकरण समितीचे नाव नाही आले. खतगांवकर (उपायुक्त (मु.) साहेब वृक्षप्राधिकरणचे अधिकारी कोण आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यात इरकर चे नाव टाका. ह्या सर्वांवर नियमानुसार कारवाई होण्यासाठी प्रस्ताव मा. आयुक्त साहेबांकडे सादर केला जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब महत्त्वाचे एक असे आहे की आता गेल्या पंधरा वीस दिवसापासून आपले जे अतिक्रमण विभागाचे आयुक्त श्री. दिवटे साहेब आहेत ते रजेवर गेले आहेत. त्यांनी नगरपालिकेतून आस्थापना विभागातून, आपल्या इकडून कार्यमुक्त झाले की काय निरनिराळे अफवा आहेत नेमके काय आहेत? आणि जर रजेवर गेले असतील तर नालेसफाईचे एवढे महत्त्वाचे काम चालू आहे. अतिक्रमण हटवण्याच्या महत्त्वाच्या पोस्टवर आज ते आहेत. तर त्यांना कुठच्या मोठ्या कारणास्तव एवढी मोठी रजा दिली. मुंबईच्या मनपात आम्ही पेपरमध्ये वाचतो की मा. आयुक्त साहेबांनी सगळ्यांच्या रजा वगैरे रद्द करुन टाकल्या आणि आपल्याकडे महत्त्वाच्या खात्यावरती जबाबदार असलेला अधिकारी १५-२० दिवस जावून कुठेतरी बसतो. जर त्यांनी मेडीकलच कारण सांगितले असेल तर व्यवस्थित मेडिकलचे सर्टिफिकेट जोडले का? गर्व्हमेंटच्या हॉस्पिटलचे जोडले का? की जेणेकरुन त्यांना एवढ्या दिर्घकाळाची रजा द्यावी. बाजुच्या मनपात असलेल्या रजा रद्द केलेल्या आहेत. त्या अधिकाऱ्यांना बोलवलेले आहे. आणि आज त्यांचे दालन १५-२० दिवसापासून बंद आहे. हाताखालचे कर्मचारी आम्हांला कुठेच दिसत नाही. आज माझ्या विभागामध्ये अतिक्रमण तोडण्याकरिता सांगतो अक्षरशः परवा अमावस्याची पाण्याची भरती आली. त्या बनवलेल्या रुममध्ये पाणी घुसलं आज उद्या जिवीतहानी झाली. साहेब, झोपड्या बोलू नका. ते परमनन्ट स्ट्रक्चर आहे. त्याच्यावर ग्राउंन्ड प्लस वनचे पण स्ट्रक्चर आहे. त्याला क्रॅक गेलेले आहे. त्या रूम्स वाकड्या झालेल्या आहेत. तुम्ही त्या दिवशी तोडायला गेले असताना अमावस्याच्या दिवशी भरतीचे पाणी त्या रुममध्ये भरलेले होते ही गोष्ट खरी आहे की नाही. ज्या रुम बनवल्या होत्या. त्याच्यामध्ये अमावस्याच्या खाडीचे पाणी आता गेले म्हणजे साहेब पावसाचा एक अंदाज लावा. हे बघा तुम्ही नाही पाडलात ना तरी आम्हांला काही फरक पडत नाही. आम्ही नगरसेवक आहोत. आम्ही तुम्हांला दृष्टीपटात आणून दिले येथे दुर्घटना घडेल काही माणसे बांधकाम कोसळून रात्री जर त्या रुम पडल्या तर तुम्हांला ५-२५ मुडदे भविष्यामध्ये काढायला लागतील. ही कल्पना आम्ही सगळ्यांना देवून ठेवले. आता ही जिम्मेदारी तुमची. बोट पोकलन तुम्ही काढले का? पहिली गोष्ट ही की नाल्यामध्ये बोट पोकलन होते. त्याची कार्यवाही करायच्या अगोदर तुम्ही का काढले. आणि तुम्ही मुका पासुन साफसफाई करत आलात तर अतिक्रमणाची ही बांधकामे ठेवलीत का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब हे प्रोसिडींगमध्ये नोंद होते का?

**मिलन म्हात्रे :-**

सभा सुरु झाले ना, १२ वाजले मी टायमिंग बोलतो ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून मी तुम्हांला सांगिते नाहीतर प्रोसिडींग होणार नाही.

**नगरसचिव :-**

दि. ५/०६/२००८ सकाळी ११.०० वा. ची सभा अर्धा तासासाठी सभा तहकूब मा. सभापती साहेबांनी केली होती. सदर सभा ही १२.०० सभा सुरु करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यामध्ये सभेचे जे अजेंडा मिळालेला आहे. ऑक्टॉय बद्दल महाराष्ट्र शासनाचे काय पत्र आलेले आहे. ह्याची पण आपण जाणीव दिलेली नाही. ऑक्ट्रॉय हा विषय व्यापारामध्ये फार महत्त्वाचा आहे. वेगवेगळी चर्चा आहे तर सचिवांनी पहिली ऑक्ट्रॉय संबंधित महाराष्ट्र शासनाचा निर्णय सांगावा.

**मा. सभापती :-**

आपण पहिला इतिवृत्तांत पूर्ण करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये ऑक्ट्रॉयचा विषय आला पाहिजे होता. तो विषय आला नाही आणि महाराष्ट्र शासनाने मुदतवाढ दिलेली आहे. मा. स्थायी समितीकडे तो विषय आला पाहिजे होता. त्यांनतर मा. महासभेत जाणार किंवा...

**मा. सभापती :-**

त्यांची २२ जून पर्यंत मुदत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महाराष्ट्र शासनाने काय सांगितले. व्यापारी लोक विचारतात कशामुळे मुदत दिलेली आहे? का दिलेली आहे?

**मा. सभापती :-**

आपण मुदत दिलेली नाही. त्यांची ऑलरेडी २२ जून पर्यत मुदत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मुदत दिले. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक आलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब २२ जून पर्यंत मुदत आहे. परंतु आपण जे सेस वसूल करणार त्याच्याबद्दल आपली काय कार्यवाही झालेली आहे. आपण तयारी किती केलेली आहे त्यांचे इन्फॉरमेशन तरी द्यायला पाहिजे होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महाराष्ट्र शासनाने ३० जुलैपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असे ऐकवत आहे.

**शरद पाटील :-**

ऐकवत आहे की खरे खोटे आहे त्याची माहिती द्यावी ना.

**मा. सभापती :-**

पुढच्या मिटींगला व्यवस्थित विषय येईल ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब महाराष्ट्र शासनाचे पत्र आलेल आहे.

**शरद पाटील :-**

त्याचा खुलासा करा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याचा खुलासा करा आणि पत्र आले आहे ते पत्र दाखवाना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब तुमच्याकडे जी माहिती असेल ती सिम्पली ॲण्ड शॉर्टमध्ये देवून टाका. ते लोक आम्हांला विचारतात. मग आम्ही त्यांना उत्तर काय देणार ॲटलिस्ट इन्फॉरमेशन आम्हांला पाहिजे. बाकी काही नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

राज्य शासनाच्या मागील. अधिवेशनामध्ये महाराष्ट्रातील ‘‘ड’’ वर्ग महापालिकेचा...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब परत सांगतो की मिटींग चालू का?

**मा. सभापती :-**

हो चालू झाली.

**मिलन म्हात्रे :-**

घोषणा केली का?

**मा. सभापती :-**

हो केली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

महाराष्ट्रातील ‘‘ड’’ वर्ग महापालिकेचा जकातकर बंद करुन उपकर लावण्याबाबतचा धोरणात्मक सुचना त्याठिकाणी जाहिर झालेल्या होत्या. त्या अनुशंगाने राज्य शासन निर्णय घेत आहे. आणि आवश्यक ती तयारी म्हणून ‘‘ड’’ वर्ग महापालिकेतील अधिका-यांचे प्रशिक्षण राज्य शासनाने आयोजित केलेले आहे. प्रशिक्षणासाठी प्रथम बॅच चे प्रशिक्षण सुरु आहे आणि आपल्या महापालिकेचे तीन अधिकारी बी.कॉम आणि ग्रॅज्यूएट असलेले पाठवलेले आहे. त्यापुढे प्रशिक्षणाचे दोन सत्र अजून होणार आहे. त्यामध्ये सुद्धा आपले तीन तीन असे आपला सहा अधिकारी पाठवणार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना पाठवले त्यांची नावे काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

श्री. अविनाश जाधव, श्री. जनार्दन भासे, श्री. हेमंत पाटील असे तीन अधिकारी मा. आयुक्त साहेबांच्या मंजूरीने पाठवलेले आहे. मिरा भाईंदर महापालिकाची जी जकात वसूली आहे. त्याने आपण करतो ते आपल्याला माहित आहे. आणि सदर ठेक्याची मुदत २२ जून पर्यंत आहे. राज्य शासनाने ह्यामध्ये ३१ तारखेपर्यंत १ महिन्याची मुदतवाढ दिल्याबद्दल सन्मा. सदस्यांनी ह्याठिकाणी सांगितलेले आहे. पण अद्याप आम्हांला असे कुठलेही पत्र आलेले नाही. ह्याबाबत सविस्तर वृत्तांत आणि माहिती आणि पुढे आपण करावयाचे नियोजन त्यासाठी येणा-या पुढच्या स्थायी समितीमध्ये विषय घेवून आपल्याला सर्व अवगत केले जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही विषय द्यायच्या अगोदर तुम्ही शासनाला विचारत नाही की तुम्ही २२ जून चा टार्गेट दिलेला आहे म्हणजे २२ जूनला आमचे टेंडर संपते. मग आता तुमचे जे ट्रेनिंग आहे...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही सुरुवातीला ओझरचे सांगा म्हटले ना. शासनाला आधी कळवले आहे. आम्ही नाही कळवले असे नाही. आणि आपण निश्चितच शासनाची सर्व माहिती आपल्याला पुढच्या सभेत आणून देवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे तुम्ही मुदतवाढ मागितले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही मुदतवाढ नाही मागितले.

**नगरसचिव :-**

मी पान नं. वाचतो.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. १३ मध्ये माझ्या वरचा जो पॅरेग्राफ आहे. त्याच्या मध्ये शेवटला स्क्रॅब आणतात तेवढे ते लोक विकतात. तर तिथे स्क्रॅप पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पान नं. ३६ मध्ये जो मेडिकलचा औषध खरेदीचा जो ठराव झालेला आहे. त्यामध्ये जे रुलिंग अध्यक्ष महाशयांनी केलेले त्याच्यामध्ये कुठलीच नोंद आलेली नाही. म्हणून जी टेप आहे ती टेप वाजवून आम्हांला खुलासा त्याचा करायचा आहे. त्यामध्ये मुद्दाच नाही. साहेबांनी अध्यक्ष साहेबांनी मुदत सांगितले. किती रुपयाचे औषध खरेदी करायचे ते सांगितले आणि त्याचा काहीही उल्लेख झालेला नाही. मागणी नुसार मागावी किती महिन्यासाठी मागवावी किती मागवावी कुठलाही उल्लेख ह्या ठरावामध्ये झालेला नाही. म्हणजे हा दोन वर्षाचा ठराव दिलेला आहे का? आणि आतापर्यंत या ठरावाच्या अनुशंगाने किती औषधे खरेदी केलेली आहे. ह्याचाही जरा आम्हांला अहवाल द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो आपल्याला आवश्यकतेनुसार २००६-०७, २००७-०८ ला मागवले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव काय आहे ते आम्हांला सांगा ना तुम्ही मा. सभापती साहेबांनी ठरावात जी रुलिंग दिलेली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण आवश्यकतेनुसार आपण मागवलेले आहे. आपण रेट्स मंजूर करुन घेणार आहे. आणि आपण औषधे आवश्यकतेनुसार मागवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याच्यात उल्लेख कुठे आला? आणि पुढच्या निविदा म्हणजे कुठली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आताच्या ह्याच वर्षीच्या सन २००८-२००९ पर्यंतच्या आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही टेप वाजवा ना. ह्यांचे रुलिंग ऐकू द्या ना. म्हणजे काही ठराव इकडे करायचे आणि काहीही ठराव द्यायचे. आम्ही वाचायचे नाही का? असे वाटते का? ह्याच्यात कुठलाही उल्लेख नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण सविस्तर चर्चा करुनच आपण केलेले आहे आपण औषध कधी पर्यंत मागवणार आहे. पावसाळा होईपर्यंत जो साठा लागणार तोपर्यंत औषध मागवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठली ओषधे आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आहेत ना ॲण्टीबायोटिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या औषधाचा पावसाळ्याशी काय संबंध आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

रेटस मंजूर करुन...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब तुम्ही जे रुलिंग केलेले आहे त्या रुलिंगचा उल्लेख नाही त्यांच्यामध्ये किती दिवसांपर्यंत किती औषधे मागवायचे. त्याचाही उल्लेख नाही. ह्याच्यात काही नाही.

**संभाजी पानपट्टे :-**

त्यावेळेला त्याच्या संदर्भात सविस्तर चर्चा झालेली आहे. मी प्रत्येकाचा उत्तर दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव आणा ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब हा ठराव कसा आहे कधी औषधे घेतली? कशासाठी आहे ते महत्त्वाचे नाही. पण आपल्या या मिनिटसमध्ये ते आले आता महावीर मेडीकल सप्लायवर ११,१२,२६,२७ हा काय प्रकार आहे ते काहीच कळायला मार्ग नाही म्हणजे ह्याचा गोषवारा तरी व्यवस्थित द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

गोषवारा दिला होता.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव आहे ना. ह्या ठरावावर तुम्ही कारवाई केली. उद्या ह्याच्यावर जे काही पैसे खर्च होणार आहे. बरोबर आहे. आर्थिक प्रशासकीय वगैरे मंजूर आम्ही तुम्हांला देतो. आता ह्या ठरावामध्ये मला सांगा आता सन्मा. सदस्या सुनिता पाटील. आणि शानू गोहिल यांच्या सह्या आहे. आत्ता ११, १२, १३ हे काय आहे? महावीर मेडिकल सप्लायच्या समोर ह्या तारखा आहेत फिगर्स आहेत कॉन्टेटी आहे. मी तुम्हांला उदाहरण देतो. ही कॉन्टेटी आहे की, १०६ पिस त्यांनी दिले की १०६ रुला ही औषधे देणार आहे. किंवा त्याचा अनुक्रमांक नं. आहे. सिरीयल नंबर १२ वगैरे आपण आता निविदेच्या पैशाला आर्थिक गोष्टी करतो. आता अनुक्रमांक १०४ आहे तर त्या १०४ अनुक्रमांकाची जी वस्तू आहे ती किती रुपयाला दिले. त्याची कॉन्टेटी काय आहे? साहेब त्याच्यात काहीही टाकलेले नाही. हा ठराव बघा ना. तुम्हाला तरी पटतो का हा ठराव ते बघा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

गोषवारामध्ये सविस्तर दिलेले आहे. हा ठराव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठरावात डिटेल आले पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

गोषवाऱ्यामध्ये आम्ही सविस्तर माहिती दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही गोषवारे सोडा कारण तुमचे गोषवारे व्यवस्थित नसतात उलट हा ठराव आहे ना हा ठराव इम्लीमेंटेशन ला जातो आणि मग राज्य सरकार कडे त्या माकड कोलांड्या मारायला लागतात. हे रद्द झाले ते रद्द झाले ह्याचे नाव सोडले बाकीचे नाव पकडले तेवढे सोडले. हे काय चालले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्ही मला सांगा की मी तुम्हांला कोणत्या प्रश्नाचे उत्तर देवू.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव जो आहे ना. हा ठराव आम्हांला तरी काही कळत नाही. हे फिगर नेमके काय आहे? अनुक्रमांक आहे सिरियल नं. आहे. क्वॉन्टेटी आहे? काय आहे ते कळायला मार्ग नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुलनात्मक तक्त्याची जी दराची मेडिसीनची यादी होती. त्यातले अनुक्रमांक आहे त्या अनुक्रमांकाला त्या आयटमचे दर त्या तक्त्याच्या आहे. साहेब हा खूप मोठा तक्ता आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगांवकर साहेब हा ठराव वाचा आणि त्यामध्ये तक्ता सोबत जोडलेला आहे...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुलनात्मक तक्ता दराचा जो आहे तो गोषवाऱ्या सोबत त्यावेळेच्या स्थायी समितीसमोर आरोग्य विभागांनी त्यांनी खरेदी करावयाच्या औषधांचा नावाचा आणि त्यांना सप्लाय करणाऱ्या एजन्सी चा एक तुलनात्मक तक्ता त्याला...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुमचा एक रस्ता लेफ्टला जातो. त्यांचा रस्ता राईला जातो खाली काय म्हणता वाटाघाटीनंतर आलेले नविन दर बरोबर आहे ना. मग १०४ हा दर आहे का? आम्ही हा दर समजावा का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे दराचे ॲटीम लिस्ट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परत तेच अहो दर सोबतच्या तक्त्यात जोडलेले आहे १०४ रु. तुम्ही कशाकरिता दिले? कुठले औषध आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो अनुक्रमांक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आता आपण म्हणता अनुक्रमांक आहे आणि ठरावात म्हणता की दर दिले तर ते काय दिले ते पहिला क्लिअर करा मूळ ठराव कुठे आहे तो आणा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सांगतो. हा ठराव मंजूर करताना आरोग्य विभागाने जो गोषवारा दिला होता. त्या गोषवाऱ्यासोबत हे दरसूची दिली होती. प्राप्त दरसूची त्यांना जे आयटम घ्यायचे आहे आणि समजा नंबरला अमुक काहीतरी नाव आहे. त्याची संख्या आहे. आणि त्याबाबत प्राप्त निविदा धारकांचे नाव होते त्यांनी काय दर सुचवलेले आहेत आणि त्यात सर्वात कमी दर ज्यांना लागू झालेले आहे त्या त्या प्रमाणे अनुसुची ठरावात नमुद केलेले आहे. आता समजा दिडशे नाव आहेत. त्या दिडशे नावामध्ये...

**मिलन म्हात्रे :-**

१००टक्के बरोबर आहे. साहेब तुम्ही इतर बांधकामाचे वगैरे आणता ना तेव्हा साहेब कंपनी त्यांनी दिलेले दर वाटाधाटी झाल्यानंतर...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे सगळं झाल्यानंतर त्यांनी डिटेल द्यायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

वाटाघाटी झाल्यानंतर ठरलेले दर म्हणजे एकूण निविदा मंजूरी कोणाला दिली? त्याचे बोल्ड मध्ये अक्षर.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब आहे ते गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हे इतिवृतांत आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठराव शॉर्टमध्ये केले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हे पुन्हा इतिवृत्तांतामध्ये आहे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांची अपेक्षा काय होती आता समजा महावीर मेडिकल सप्लायवर आहे तर त्यांचे आयटम कोणते आहे त्याचा एक तक्ता...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हे चार पान आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब ५-६ पेजेसचा ठराव होईल म्हणून आपण हा शॉर्टमध्ये केला.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांला काय आमच्याकडे १०० पेज आहे. ते आम्ही तुम्हांला देतो. साहेब हा संक्षिप्त आहे. त्याच्यात काय आहे ते कळायला मार्ग नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब अवश्यक्तेनुसार मागणी तुम्ही त्याला मान्यता दिली. आता मला सांगा. पानपट्टे साहेबांनी ह्या दोन महिन्यामध्ये किती लाखाची औषधे आणले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

एकदाच मागवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती लाखाची?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जवळ पास ७० लाख रु. ची औषधे मागवलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

७० लाख रु.ची औषधे म्हणजे अख्ख्या वर्षाचा बजेट एक कोटी २० लाख रु. आहे आपण मागच्या बजेटमध्ये एक कोटी २० लाख रु. आणि तीन महिन्यासाठी ७० लाख रु.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तीन महिन्यासाठी नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्हांला तीन महिन्याची आवश्यकता किती होती? मा. सभापती साहेब हे जे औषध खरेदी केली ते जास्त औषध खरेदी केली आवश्यकतेनुसार तुमच्या ठरावामध्ये एक बाजू नमुद करतात की, आवश्यकतेनुसार औषध खरेंदी करायचे आणि एका बाजूला पाहिजे तशी औषधे मागवून भंडार पाल विभागाकडे जमा केलेली आहे म्हणजे शेवटी आवश्यकतेनुसार हा शब्द का टाकला? जर तुम्हांला अवश्यकता का? आज नविन वर्ष सुरु झालेले आहे. तुम्हांला तीन महिन्यामध्ये किती आवश्यकता लागणार होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा. वार्षिक मागणी आयडेन्टीफाय केली जाते. आणि वार्षिक मागणीचे अंदाजित रक्कम निश्चित केली जाते. त्या आधारे दरपत्रक मागवले जातात. आणि ते दरपत्रक स्थायी समितीमध्ये मंजूर केले जाते. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर वेळोवेळी विभाग प्रमुख मा. आयुक्त साहेबांकडे आवश्यकतेनुसार प्रस्ताव सादर करतात आणि मा. आयुक्त साहेबांच्या मान्यतेने ते मंजूर दरपत्रकधारकांना आदेश दिले जातात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला एवढेच सांगायचे आहे की आवश्यकतेनुसार ७० लाख रु.ची. औषधाची आवश्यकता होती का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आवश्यकता होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दाखवा त्या दोन महिन्यातून किती औषधे वापरली पानपट्टे साहेब तुम्ही प्रत्येक गोष्टीमध्ये नगरसेवकांना क्रॉस करतात. ही तुमची चुकीची पद्धत आहे. जेव्हा १ कोटी २० लाख रु. आपण पूर्ण १ वर्षासाठी बजेटला देतो आणि तुम्ही ७० लाख रु. ची औषधे दोन महिन्यासाठी मागवली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दोन महिन्यासाठी नाही. २००७-०८ ला औषधे मागवले नव्हते...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जे मागच्यावर्षी निरोगी झाले. त्यांना तुम्ही आता औषधे पाठवली.

**शरद पाटील :-**

पानपट्टे साहेब तुम्ही आता ७० लाख रु.ची औषधे मागवली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब हो मागवली.

**शरद पाटील :-**

कधी मागवली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन २००७ च्या नोव्हेंबर महिन्यामध्ये मागवली.

**शरद पाटील :-**

प्रोसिजर नोव्हेंबर महिन्यामध्ये झाली. आता ह्याची तरतुद कधी झाली? ह्याचा ठराव दि. १०/०१/२००८ ला झाला. ती प्रोसिडींग कसली आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ही औषधे ॲडव्हान्स मध्ये मागवलेली आहे. आपण जी औषधे मागवली ती पूर्ण पावसाळा जाईपर्यंत औषध मागवली आहे.

**शरद पाटील :-**

मग आता तुमच्याकडे औषधे आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आहेत ना.

**शरद पाटील :-**

कुठली कुठली औषधे आहेत ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

रजिस्टरच आहे ते मी तुम्हांला दाखवतो.

**शरद पाटील :-**

सांगा ना कुठची कुठची औषधे आहेत? धुवा मारायला आपण काय टाकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब ठरावामध्ये आवश्यकतेनुसार जेव्हा मागच्या बजेटमध्ये १ कोटी २० लाख रु.ची तरतुद संपूर्ण वर्षासाठी करतो आणि आपण दोन महिने राहिलेले आहे. नविन टेंडरसाठी १ कोटी २० लाख रु. तरतुद केलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की...

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठराव काय झाला ते मी तुम्हांला तोंडी सांगतो ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव चुकीचा आलेला आहे. सचिव साहेब माझी मागणी आहे की तुम्ही टेप मागवा आणि मा. सभापती साहेबांचे रुलिंग ऐकवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी दोन मिनिटात सांगतो तर सांगू का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्थायी समितीमध्ये जो ठराव झाला तोच ठराव आहे ना. ठराव चुकीचा कसे आणले? सचिव साहेब, तुम्ही काही चेंज केले का?

**नगरसचिव :-**

जो ठराव झाला होता तोच ठराव आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तोच ठराव आहे ना. मग तुम्ही सांगा ना की ठराव चुकीचा नाही म्हणून.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बोला ना.

**नगरसचिव :-**

जो ठराव वाचन झाला तोच ठराव आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वाचन झालेले नाही मी सांगतो सचिव साहेब मी तुम्हांला दोन दिवस आधी फोन केला होता. ह्याच्यामध्ये मा. सभापती साहेबांची रुलिंग कुठे आले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

१ कोटी २० लाख रु. चे बजेट होते आपल्या आवश्यकतेनुसार ७० लाख रु.ची औषधे मागवून घेतली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब तुम्ही रुलिंग द्या की तुमची प्रोसिडींग बघून घ्यावी तुम्ही सांगितले तीन महिन्यामध्ये...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणतेही कामकाजावर सह्या करतात पुढच्या निविदा फायनल होईपर्यंत कामकाज करतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मी तुम्हांला मगाशी बोललो ना त्यांचे म्हणणे बरोबर आहे. सन्मा. सदस्य खान साहेब बसले होते. खान साहेबांनंतर त्यांना ती खुर्ची दिली त्यात ते बसले. बाहेर जावून आले. त्यानंतर परत त्यांचे स्टेटमेंट आहे. ते ह्या प्रोसिडींग मध्ये नाही आले मग पुढच्या मिटींगमध्ये मॉरस रॉड्रिक्स साहेब हे सभापती म्हणून बसले. ते कधी? की शेवट पर्यंत मिटींग खान साहेबांनी चालवली. ह्याचा खुलासा जरा होवून जावू द्या ना. मी पहिलाच बोललो. प्रोसिडींगमध्ये कॅसेट वाजते त्यानुसार नाही आमचे स्टेटमेंट पण बरिचशी गाळलेली असतात. तुमचे शॉटहॅण्ड वाले लिहित जातात. टेप वाजवतात. परत ते कुठेतरी गप्पा मारत जातात. तिसऱ्या माळ्यावर तोच कार्यक्रम चाललेला असतो. त्या कॅसेटवरती...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा ठराव खान साहेबांच्या काळातच झाला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

रुलिंग १०१ नाही १०५टक्के मा. सभापती मॉरस रॉड्रिक्स साहेबांनी दिले होते.

**मिलन म्हात्रे :-**

वरती ना कॅसेट घेवून बसतात. साहेब ते एका बंद खोलीत घेवून बसले पाहिजे. जेव्हा तो शॉर्टहॅण्ड वाला कॅसेट होवून बसतो. त्याचे लक्ष तिकडे एका ग्र असले पाहिजे. चार ठिकाणी गप्पा मारत बसतात. मध्येच बटन ऑन करतील. थोडसं ऐकतील परत लिहितील परत बंद करतील. परत लिहितील. हा काय प्रकार चालतो. ते काही कळत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पानपट्टे साहेब हा जो ठराव आहे आणि तुम्ही जी औषध मागितली ती मागच्या वर्षासाठी मागितली की ह्या वर्षासाठी मागितली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मागच्या वर्षासाठी आणि पुढच्या वर्षासाठी सुद्धा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्याकडे आर्थिक वर्षाचे २००७-०८ आहे आणि तुमच्याकडे जी प्रोव्हिजन होती ती २००७-०८ ची होती. पुढच्या वर्षाची प्रोव्हिजन तुम्हांला माहित नव्हती. मग तुम्ही पुढच्या वर्षासाठी नाही ह्याच वर्षासाठी मागितली असेल ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

२००८ ची जरी प्रोव्हिजन असली तरी १ कोटी २० लाख रु.ची होती. आवश्यकतेनुसार लगेच आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेणे. पुन्हा पाउस लागणार त्यावेळी औषधाची आवश्यकता लागणार असल्यामुळे...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्याकडे प्रोव्हिजन किती शिल्लक होती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
आमच्याकडे १ कोटी रु.ची प्रोव्हिजन शिल्लक होती.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
१ कोटी रु.ची प्रोव्हिजन शिल्लक होती. आणि तुम्ही औषध किती रु.ची मागवली.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
७० लाख रु.ची ओषधे मागवली आणि ते आवश्यक आहे ना. आता ह्यावर्षी आणि पुढच्यावर्षी काय त्यात काय प्रश्न आहे.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
उद्या ती औषधे एक्सपायर डेट झाली तर त्याला जबाबदार कोण आहे?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
लाँग टर्म एक्सपायर डेट ची घेतो.
**ओमप्रकश अग्रवाल :-**
साहेब आम्हांला माहित आहे आणि साहेब माझे तोंड उघडायला लावू नका. मा. सभापती साहेब टेप वाजवा आणि तुमची रुलिंग मला सांगा कारण तुमची रुलिंग ह्याच्यातून गहाळ झालेली आहे.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
मा. सभापती साहेब ते आपण तपासून घेवू शकतो. सन्मा. सदस्य सचिव साहेब आणि........
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
साहेब आमचे असे म्हणणे आहे की, जेव्हा संपूर्ण वर्षासाठी १ कोटी २० लाख रु. ची आपण तरतुद करतो. मा. सभापती साहेबांनी औषधे आवश्यकतेनुसार आणावी हे सांगितलं असेल. पण त्यांनी तीन महिन्यामध्ये लागणार नाही तेवढी औषधे खरेदी केली. त्यांनी पूढच्या ६ महिन्याचे औषधे खरेदी करायचे कारण काय?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
तुम्ही जे म्हणता ना. ते आपल्याला तपासावे लागेल. तसे ठरावामध्ये जे आलेले आहे ना. तसे आवश्यकतेनुसार आलेले आहे.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
त्यांनी लिहिलेले आहे. मा. सभापती साहेबांचे रुलिंग होते. आम्ही मा. सभापती साहेबांना पण फोन केला होता.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
कन्फ्यूजन असे आहे की साहेबांचे तसे म्हणणे आहे म्हणजे सन्मा. सदस्यांचे की तुम्ही फक्त तीन महिने म्हणजे अप टू मार्च २००८ पर्यंत औषधे मागवा. त्याच्यानंतर जी औषधे् येणार ती नंतरच्या बजेटमध्ये मागवा. बरोबर आहे. असे तुमचे म्हणणे आहे ना.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
साहेब तसा ठरावात आलेले नाही.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
तसे ठराव आलेला आहे. ह्यांचे असे म्हणणे की मा. सभापती साहेबांनी रुलिंग दिलेली आहे.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
ही बाब विभागाशी निगडीत नाही. ही आपल्या समिती कामकाजाशी संबंधित आहे. आपण ते नंतर तपासून घेवू शकतो ना.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
म्हणजे मा. सभापती साहेबांनी जे रुलिंग दिले ह्याला मान्य नाही या ठरावाच्या अधीन
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
मान्य नाही. असे कोण म्हणते. कदाचित ते तिथे नसेल तर आपण कसे काय म्हणू शकतो. तुमचे म्हणणे आहे की असे घडलेले आहे पण ते आले नाही. तर ते आपल्याला तपासावे लागेल.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
आताच तपासा ना.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
मा. सभापती साहेबांसमोर आणि तुमच्या समोर आपण तपासू.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
तोपर्यंत दुसरा विषय घ्या. हा विषय पेंन्डींग ठेवा.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे. ते कालावधीचा मुद्दा माडतात. तर मा. सभापती साहेबांसमोर त्यांना तपासून अवगत केला जाईल. आणि त्याची वस्तुस्थिती समितीसमोर सादर केली जाईल. तोपर्यंत आपण दुसरे कामकाज...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब माझे असे म्हणणे आहे की, जेव्हा तुम्ही आठ महिने औषधे मागवली नाही तुमचे १ कोटी रु. शिल्लक होते. आणि तुम्हांला एवढी काय घाई होती की तुम्हांला तीन महिन्यामध्ये ७०-८०लाख रु.ची औषधे मागवायची होती. म्हणजे ह्याच्यामध्ये कुठेतरी किंतु परंतु आहे एवढी घाई करायची गरज नव्हती. औषधे कुठे पळत नव्हती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना ह्याची कल्पना आहे की, मागच्या निविदा रिकॉल झाल्या होत्या. त्याचा कालावधी गेला होता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा कालावधी का जातो? मेडिकलचे पैसे वेळेवर मिळत नाही. म्हणून ठेकेदार ह्याच्यात भरत नाहीत. मेडीकल मध्ये मार्जिन किती आहे ते सर्वांना माहित आहे. म्हणून कोणी ठेकेदार भरत नाही. आणि वरचे काय ते तुम्हा सगळ्यांना माहित आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते आपण तपासुन घेउ. सचिव साहेब पुढे घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि आता जेवढी ७० लाख रू. ची औषधे आली असेल म्हणजे किती किती औषधे आली आहे. किती किती औषधे आहे हे सर्व आम्हाला पुढच्या मिटींगमध्ये आले पाहिजे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, पान नं. ४० मध्ये बारकुंड साहेबांनी जे म्हटले की, खड्डे वगैरे खोदतात त्यासाठी प्रत्येक प्रभाग समितीचे वेगळे करायचे आहे. हे खड्डे खोदल्यानंतर ते ताबडतोब बंद केले पाहिजे. जर त्याचा प्रपोजल कधी आणणार. बारकुंड साहेब स्थायी समिती सभा होती त्यावेळेला आपण सांगितले की.....

**शिवाजी बारकुंड :-**

एम.टी.एन.एल. किंवा पाईपलाईन.

**एस. ए. खान :-**

पुढच्या मिटींगमध्ये तरी आणा खड्डयामुळे नागरिकांना किती त्रास होतो.

**शरद पाटील :-**

बारकुंड साहेब, मस्त प्रश्न आहे. ते कधी होईल? आणि आता दुसरे म्हणजे आता खोदायला जरी येणार ना तर आम्ही त्यांना खोदून पण देणार नाही. येवून खोदतात. काल एम.टी.एन.एल. वाले खोदायला आले होते.

**एस. ए. खान :-**

बारकुंड साहेब, पुढच्या सभेमध्ये हा विषय घ्या.

**शरद पाटील :-**

पान नं. ४३ वर बारकुंड साहेब आता बि.पी. रोडचे आणि ह्याचे जे आहे. बि.पी. रोड आणि बंदरवाडी रोड काल पाउस पडला आता बी.पी.रोड ला सगळ खोदलेले आहे ते कधी होणार मग?

**मा. सभापती :-**

तुम्ही शिंदे ना पाठवा.

**शरद पाटील :-**

साहेब, पण आता पाउस पडतो ना.

**दिपक खांबित :-**

सहा एक दिवसात होईल.

**शरद पाटील :-**

पावसात होईल का? जर पाउस पडला तर त्याचे काय करायचे म्हणजे मे नंतर करणार.

**दिपक खांबित :-**

हो नंतर करू.

**शरद पाटील :-**

मी काय विचारतो की, पाउस पडला आणि नाही झाले तर काय करणार? आपण ह्याच्यासाठी विचारतो की नंतर करणार की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

दि. २४/०१/२००८ च्या इतिवृत्तांतामध्ये पान नं. २४ मध्ये माझे स्टेटमेंट आहे. त्या ॲग्रीमेंटमध्ये कमिटीचा रिपोर्ट ॲलकेस्टर आहे तिथे ॲनेक्शर पाहिजे. त्यानंतर माहितीच्या अधिकारात मागितल्यावर पाहिजे आणि खाली पटकन गेले आणि ते रजिस्ट्रेशन करून टाकले असे आहे. मा. आयुक्त साहेबांनी रजिस्ट्रेशन केलेले आहे. पान नं. २८ मध्ये पुर्ण स्टेटमेंट मध्ये दहा हजार रू. आणि इकडील ५ हजार रू. किंवा त्याच्याखाली गर्व्हरमेंटच्या नियमानुसार आपण जशी जिल्हा परिषदेची जागा ताब्यात घेतली. असे आले

पाहिजे. त्यानंतर येथे खाली मा. आयुक्त साहेबांचे निवडणूक नॉम्स त्यानंतर त्याच्याखाली दिवसाचे नोटीसीने १० टक्के पेक्षा जास्त आहे. त्या विकासकाला त्या आरक्षणामध्ये हे क्लेट हा शब्द काय आहे ते कळायला मार्ग नाही. हा शब्द काय आहे?

**नगरसचिव :-**

मी बघुन घेतो ते काय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी तुम्हाला मागे बोललो होतो ना. एका पानात केवढ्यातरी मिस्टेक्स आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या सभांचे इतिवृत्त ठरावामुळे तयार झालेले नाही, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करावी.

**मिलन म्हात्रे :-**

विदिन दिस सिक्स मन्थ असे पाहिजे. त्यानंतर पान २९ वर सुधरवणार कोण? अर्बीट्रेटर म्हणजे काय? तिकडे अर्बीट्रेटर पाहिजे. अर्बीट्रेटर दिलेले आहे. त्यांनर परत माझेच स्टेटमेंट आहे. खाली दुसऱ्या पाण्यात ह्याच्यात सगळे हातपाय बांधून घेतलेले आहे. ह्याच्यानंतर खाली आर्किटेक्ट ने केले. आज जिकडे एक फॅमिलीचा पुर्ण फ्लॅट हडप करतो. त्याचे सगळे नॉम्स परत त्याच्यानंतर त्याने ह्या तारखेत हे केलेले आहे. साहेबांना होते का ह्यामध्ये एक महिना अगोदर म्हणजेच दि. १८/०७/०७ ला ॲग्रीमेंट केले आणि दि. २०/०६/०७ म्हणजे १ महिना अगोदर तिकडे रजिस्ट्रेशन केले तिकडे त्यांनी दि. १०/०६/०७ अशी तारिख दिलेली होती. तर तिथे २०/०६/०७ हवे ला डेव्हलप करण्याकरिता वर्क ऑर्डर काढली. ती दि. २०/०६/०७ ची वर्क ऑर्डर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दि. १८/०७/०७ ला ॲग्रीमेंट केले आणि २०/०६/२००७ ला तुमची वर्कऑर्डर इश्यु झाली. त्यांनतर ते रुजु झाले.

**मिलन म्हात्रे :-**

पण साहेब त्यांनी १०/०६/०७ तारिख दिले ना. तिथे २०/६/०७ पाहिजे. त्यांनतर ओवल मैदान बद्दल आहे. खालून चौथी की पाचवी लाईन आहे. ओवल म्हणजे आणि ओवल सर्कलला जो ग्राउन्ड आहे. राज्य सरकार हे ओवल मैदानाबद्दल आहे. त्यांनी व्हेल केलेले आहे. पान नं. ३० वर दुसरी लाईन आहे. त्याची तुम्हाला माहिना भराची लिबर्टी द्यावी लागेल. महिना भराची त्या डी.एम.ए. ऑफिस त्याच्याच खाली डी.एम.ए. ऑफिस बरोबर आले. पान नं. ३० वर खालून पाचवी सहावी लाईन वर आर.एस.आय. च्या ऐवजी तो एफ.एस.आय. आहे. साहेब, तुम्ही जरा चेक करा. कारण ह्या प्रोसिडींग कोर्टामध्ये जातात. आपले उपायुक्त अहवाल देतात. सदर सदस्य उपस्थित असताना. त्यांनी अस अस सांगितलेले आहे. पानपट्टे साहेब बसलेले आहे. त्यांनी वाहनाच्या केस मध्ये त्यांनी वाहन खरेदी बद्दल ॲफिडेविटमध्ये उल्लेख केलेला आहे. हे सदस्य हजर होते. आणि त्यांनी त्याच्यामध्ये सहभाग घेतला आता आपले आर.डी. शिंदे साहेब पण मागच्या पत्रामध्ये खोटे बोलले की, तो जो कमिटीच्या नियुक्तीचा ठराव होता त्याच्यात मिलन म्हात्रे हजर आहेत. साहेब, प्रोसिडींग काढून बघा. त्यात मी गैरहजर आहे. त्या मा. महासभेला मी गैरहजर आहे आणि घेवरे साहेबांनी सुद्धा दोन चार पत्रामध्ये मी हजर होतो असे लिहून दिले होते. म्हणून हे सगळ बघण गरजेचे आहे. तुम्हाला वाटते आम्ही कशाला रिस्क घ्यायची. धडधडीत धदान्त खोट लिहून टाकणार. ते बसलेले आहे. त्यांनी वाहनांच्या केसमध्ये हायकोर्टात ॲफिडेव्हीट दिलेले आहे की, मिलन म्हात्रे नी त्याला सपोर्ट केलेला आहे. त्याच्यात माझा विरोध होता. म्हणजे एकमताने किंवा ह्याच्याने नाही. माझ्या एका विरोधात पंधरा हजार वेळा सांगत असतो की, जर विरोध असेल तर माझा विरोध नोंदवा. एका विरोधात पंधरा हे बहुमत एकमत वगैरे सगळ सोडून द्या. तिकडे काउन्ट केले जाते. आम्हाला उच्च विचारा ना का ते? तुम्ही कोर्टात आलात ना तुमचे काय मत आहे तुमचे ओपिनियन काय आहे? तुमची भुमिका काय आहे? हे बहूमत एकमत वगैरे नाही पंधरा विरूद्ध एक, एक विरूद्ध पंधरा असे तुम्ही काही करा ना. अधिकारी धडधडीत खोटी ॲफिडेव्हीट जावून देवून येतात. म्हणजे आम्हाला सगळी प्रोसिडींग ट्रान्सलेट करून कोर्टाला द्यायला लागते. आणि त्यावेळेला मी ह्या सभेमध्ये ह्या मुद्दयावर हा हा विरोध केला. असे आम्हाला दाखवायला लागले म्हणजे त्याच्यामध्ये मी खोटा नाही पडलो. तुमचे डी.एम.सी. खोटे पडले. नशिब त्याच्यावर स्ट्रिक्चर आणि पनिशमेंट झाले नाही म्हणून ते निभावून गेले. ते जिवावर आलेले शेपटावर निघाले.

**एस. ए. खान :-**

दि. १०/०१/२००८ व दि. २४/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शानु गोहिल :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०५ :-**

दि. १०/०१/२००८ व दि. २४/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०५ :-**

दि. १०/०१/२००८ व दि. २४/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, मला एक अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे. २२ मे रोजी झालेल्या ठाणे लोकसभा पोटनिवडणूका जाहिर झाल्या असुन. त्यामध्ये शिवसेना, भाजप चे उमेदवार मा. श्री. आनंद प्रकाश पंरांजपे ह्यांचे ९० हजार मताने विजय झाला त्याचप्रमाणे कर्नाटक राज्यामध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीमध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. तसेच एम.एम.आर.डी.ए. निवडणूकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे श्री. शरद पाटील, श्री. मिलन पाटील आणि श्री. अनिल सावंत ह्यांची निवडणूकीत विजयी झाले. ह्या सर्वांचा मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ०६ :-**

ठाणे लोकसभा पोटनिवडणूकीत शिवसेना-भाजपाचे उमेदवार मा. श्री. आनंद प्रकाश पंरांजपे विजयी झाल्याबाबत तसेच कर्नाटक राज्यामध्ये भाजपाचे सरकार सत्तेवर आले तसेच एम.एम.आर.डी.ए. निवडणूकीत श्री. शरद पाटील, श्री. मिलन पाटील आणि श्री. अनिल सावंत हे विजयी झालेबाबत त्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत पालांडे अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा विनंती अर्ज होता. डायरी बद्दल होता. मी मा. सभापती साहेबांना पण पत्र दिले होते. आपल्याला ही दिले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी महापालिकेच्या डायरीबद्दल जे पत्र दिलेले आहे. त्याबाबतचा अहवाल निर्णयासाठी मा. आयुक्त साहेबांकडे सादर केलेला आहे. मा. सभापती साहेबांचे ही पत्र आहे आणि आपलेही पत्र आहे. आणि मा. आयुक्त साहेबांनी जे निर्णय घेतलेले आहे. आणि सदस्यांना पेमेंट केलेले नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६, नामकरण प्रस्तावास मान्यता देणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा जो नामकरणाचा प्रस्ताव आहे. त्याच्यात दोन कामे आहेत. एक कमान आणि एक भिंत बांधून माती भराव करणे. हे दोन्ही प्रकरण ह्यामध्ये आलेले आहे. कोणाच्या निधीतून किती किती खर्च करण्यात आलेले आहे. ही पहिली गोष्ट आम्हाला सांगावी आणि आता जो नामकरणाचा प्रस्ताव आलेला आहे. तिकडे नामकरण झालेले नाही.

**मा. सभापती :-**

नामकरणाचा विषय झालेला आहे का? की होणार आहे.

**एस. ए. खान :-**

नामकरणाचा विषय झालेला आहे ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे जे होते ना त्याचा झालेला आहे. त्याला मान्यता द्यायची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आणि सावित्रिबाई फुले ह्यांच्याबद्दल ही आदर आहे. सम्मान आहे. आम्ही त्याला प्रणाम करतो. पण माझा जो प्रश्न आहे. त्याचे तुम्ही उत्तर द्या. पहिले हे जे काम झालेले आहे ते कोणाच्या फंडातुन झालेले आहे की, महानगरपालिकेच्या फंडातुन झालेले आहे. नगरसेवकाच्या फंडातुन झालेले आहे. किती खर्च झालेला आहे? किती फंड महापालिकेचा आहे? किती नगरसेवकाचा आहे. ह्याची माहिती द्यावी. मग मी तुम्हाला पुढचा प्रश्न विचारतो.

**दिपक खांबित :-**

एकदा विचारा. मी सगळी उत्तर तुम्हाला एकदम देईन.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्हाला जायची एवढी घाई आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सवाल जबाब होण्यापेक्षा तुम्ही तुमचे मुद्दे मांडा ते एकदाच खुलासा करतील ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आता हा प्रस्ताव आणलेला आहे. हा प्रस्ताव आणण्यापुर्वी त्यावर नामकरण झालेले आहे की नाही. झाले असेल तर नामकरण हा विषय मा. स्थायी समितीमध्ये आणायचे वैशिष्ठ काय आहे? जर झाले असेल तर आणि नामकरण करताना महापालिकेने कशा पद्धतीने नामकरण करायचे हे पण ठरलेले आहे त्याची दखल महापालिकेच्या अधिकाऱ्याने घेतलेले आहे.

**दिपक खांबित :-**

जनता नगर येथे जे उद्यान केलेले आहे. ते संपुर्णपणे महापौर निधीतुन केलेले आहे आणि जे काही प्रवेशद्वार बांधलेले आहे ते स्थानिक नगरसेविका श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांच्या नगरसेवक निधीतुन बांधलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

फंड किती आहे? त्यांचेच टोटल फंड आहे ना.

**दिपक खांबित :-**

हो टोटल त्यांचाच फंड आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग फंड किती आहे.

**दिपक खांबित :-**

३ लाख समथिंग काहीतरी आहे वाटते. ३ लाख ४८ हजार मागच्या वर्षीचा फंड आहे. त्यामधुन बांधलेले आहे आणि सदरच्या फलका वरती आजच्या डेटनुसार नावे लिहलेली आहे. आपल्या नामकरणाचा प्रस्ताव आला आहे आणि त्यांनी त्याच्या स्वतःच्या खर्चाने केलेला आहे. महानगरपालिकेने तो खर्च केलेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब मी तुमच्याकडे एक फोटो देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव लागलेले आहे. त्याबद्दल कोणाचाही विरोध असणे गरजेचे नाही. पण ज्या पद्धतीने ह्या ठिकाणी नगरसेवकांचे नाव लागलेले आहे. आणि स्थायी समितीमध्ये त्या पद्धतीने अधिकारी नामकरणाचा प्रस्ताव आणतात. हे बरोबर आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गाडोदिया हा विषय जो आहे तो कधी ना कधी सभागृहामध्ये येणारच होता.

**दिपक खांबित :-**

मॅडम, हा प्रस्ताव आमचा आधीचा आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी आधीच हा प्रस्ताव दिलेला होता. पण त्यादिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती होती आणि त्यावेळेला नागरिकांनी आग्रह केला की, नामकरण झालेच पाहिजे. म्हणून मी स्थानिक नगरसेवक आहे म्हणून माझे नाव लावलेले आहे. त्यामुळे विरोध करायचा काही कारण नाही. तुम्ही तुमच्या वॉर्डमध्ये गेट्स बांधा, कमानी बांधा नाही तर तुमची नावे लावा आणि हे उद्यानाबाबत बोलता तिथे सावित्रिबाई उद्यान हे नामकरण अजुन करायचे आहे. म्हणून हा विषय सभागृहापुढे आलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही ज्या पद्धतीने पाटी लावलेली आहे ती महापालिकेच्या नियमाप्रमाणे बरोबर आहे का?

**एस. ए. खान :-**

मा. महासभेचा ठराव आहे आणि स्थायी समितीचा ठराव आहे. त्याप्रमाणे आहे का? की पाटी कुठे लावायची.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय पाटी लावायचा नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

विषय पाटी लावायचा नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय फक्त प्रवेशद्वाराच्या नावाचा आहे. विषय पाटी लावायचा नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव लावलेले आहे. त्याला नाव द्यायचे आहे की, नाही तो विषय आहे. तिथे अजुन त्यांची पाटी लागलेलीच नाही.

**एस. ए. खान :-**

त्यांनी पाटी लावायलला पाहिजे ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पाटी लावायची आहे ना. आपल्या नावाच्या पाटी लावायची आहे ती लावायची.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाखाली एवढ्या मोठ्या अक्षराने हे पथक आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ती नावे खाली आहे. माझ्या प्रभागात आहे मी करेन तुमच्या प्रभागात तुमचे नाव लिहा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचे फक्त एवढेच आहे की, फोटो मा. आयुक्त साहेबांनी बघावे. मा. सभापती साहेबांनी बघावे. ह्या पद्धतीने नामकरण अन्य ठिकाणी झाल्यावर आपण विरोध करणार नाही. ही प्रथा चालू ठेवायची आहे का? आम्ही अजुनही सांगतो ठराव झाला नाही. तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव लावयला आमचा विरोध नाही. पण ज्या पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ठिकाणी नगरसेवकांनी निधि वापरला आणि ज्या पद्धतीने नाव कोरलेले आहे. ते नियमाच्या बाहेर आहे. ते नाव काढा. त्यांची एक पाटी लावा ज्या पद्धतीने आपण अन्य भागामध्ये लावतो त्यांची पाटी लावायला विरोध नाही. नगरसेवकांची नावाची पण पाटी लावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सन्मा. सदस्य संजय पांगे साहेबांनी पण निधी दिला. त्यांचे पण नाव लिहिले होते. सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर साहेबांनी पण नगरसेवक निधी दिला होता तर अधुनिकीकरण त्यांचे काय? सभामंच आहे तिथे त्यांचे नाव आहे आणि बिजेपी ऑफिससमोर सन्मा. सदस्य प्रविण पाटीलन साहेबांचे एवढा मोठा गेट लावला आहे आम्ही कोणालाही विरोध केलेला नाही. आणि आम्हाला विरोध करायची इच्छा पण नाही. आणि आतापर्यंत महानगरपालिकेमध्ये जी काही बोर्ड लावलेली आहे किंवा जे होर्डींग्ज लावतात, बॅनर लावतात. प्रत्येक जण परवानगी घेउनच करते का? असे कितीतरी बोर्ड आणि बॅनर लागलेले आहे. मी पत्र दिलेले आहे त्याचा मला अजुन खुलासा मिळाला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बोर्ड आणि कटआउट हा विषय वेगळा आहे. आणि हा विषय वेगळा आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आणि जोपर्यंत नगरसेविका आहे तो पर्यंत ते नाव माझे राहणारच आहे.

**शरद पाटील :-**

अधिकाऱ्यांनी उत्तर द्यायला पाहिजे नियमानुसार आहे. मग येथे विषय संपला ना. कशासाठी हे पाहिजे. तुम्ही उत्तर देत नाही. आम्ही प्रश्न विचारले तरी त्यांना उत्तरे देवू द्या येथे आम्ही नगरसेवकांनी झगडे करायचे का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

माणूस जिवंत असताना नाव लावू नये. बाकीचे मला माहित नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नाव लावले ना. सहर्ष स्वागत करीत आहे. माणूस जिवंत असेल तो प्रश्न नाही. मी त्या पुतळा वगैरे लावला नाही. मी तुम्हाला सांगते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव वरती लावले. बाकी स्वागताचे नाव लावलेले आहे.

**शरद पाटील :-**

हा विषय तसा नाही. आमचा तुमच्या विषयाला विरोध नाही. पण ह्या कमानी बांधायच्या की नाही हे फक्त सांगा. कारण आम्ही पण बांधणार आहोत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पण त्यावेळेचा नगरसेवक निधीतुन कमानी बांधायचे मंजुर झालेले आहे. तो विषय मंजुर होवूनच केलेला आहे.

**शरद पाटील :-**

आम्हाला कमानी बांधायला नाही सांगितले.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सन्मा. सदस्य संजय पांगे यांनी नाव टाकलेले आहे.

**शरद पाटील :-**

बीज कुठे पेरत आहे त्यांनी सांगावे? त्यांना नाव काढावे कशी नाव असतील ना अशा पद्धतीने.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांची पण पाटी लागू द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

लावा ना. आम्ही कुठे नाही म्हणतो. तुम्ही पण तुमची नावे लावा.

**शरद पाटील :-**

अधिकाऱ्यांनी मला ह्याचे उत्तर द्यावे की, हे नियमानुसार असेल तर हा सांगा ना. येथे विषय संपला.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हे नगरसेवक निधी वगैरे हे कुठे वर्ग करावे काय करावे. त्याबद्दल सन २००१ चा राज्य शासनाचा जी. आर. आहे. तो मी मा. आयुक्त साहेबांना दिलेला आहे. दरवेळेला ह्या खडा जंग्या होतात. त्यापेक्षा आता बरेच नविन नगरसेवक आलेले आहे. त्यांना आता जी. आर. च्या प्रती वेल टाईप करून सर्व्हिस करा. म्हणजे नविन नगरसेवकांना सुद्धा कळले पाहिजे की, आपण काय काम करतो आणि आपण काय काम केले पाहिजे. आणि साहेब कुठलीही कमान असेल अगदी आम्ही पुणा वगैरे साईडला फिरतो. बरेचशे असे भारदस्त व्यक्ती ज्यांनी इतिहास घडवले त्यांनी सगळ अगदी केले. त्यांचे नाव कमानीवरती आले पाहिजे. नावाची कमान आणि उद्या मी जरी नगरसेवक असलो तरी माझे नाव तिकडे नाही आले पाहिजे. कुठे खाली वगैरे द्या. त्यांचा आदर ठेवा. साहेब एक साईडला नॉम्स असला पाहिजे. एखादी कमान त्या कमानीवरती तुम्ही जर मोठे नाव दिले. शहरामध्ये बऱ्याचशा पाट्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग आणि खाली नगरसेवकांची नावे आहेत. अहो बी.एम.सी. ला फक्त अमुख अमुख मार्ग मुंबई – ३२, ३६ असे पिनकोड असतात. त्या व्यक्तीचे नाव त्या संताचच नाव संताने जे कार्य केले ते आम्ही केले नाही. म्हणून ते मोठे झाले अशा काही ज्या मोठ्या आदरणीय व्यक्ती आहे त्यांचाच बोर्ड निराळा असला पाहिजे. आणि त्याच्या खाली नगरसेवकाची एक सेप्रेट पाटी लावा आणि नाव द्या की, ह्यांच्या नगरसेवक निधीतुन दिले आणि तुमचे सगळे ठराव झालेले आहे. पहिली गोष्ट अशी की, कमान मिलन म्हात्रे ह्यांनी बनवली तरी ते तुमच्या जी.आर.मध्ये ॲप्लीकेबल आहे का ते जरा बघा. आता तसे कमानीचे बघायला गेले तर तुमच्या त्या कमानीला नगररचनाने परवानगी दिली का? फायर ब्रिगेडने परवानगी दिली का? सगळे मुद्दे उपस्थित होतात. आज फायर ब्रिगेडच्या मोठ्या गाड्या आहेत. तुम्हांला ह्या कमानीचे सांगतो. गेटवरती प्रत्येक सोसायटीच्या नावाने कमानी असतात. वाटेल त्या साईज बनवतात. त्या नवरंग हॉटेलच्या इकडे गॅसच्या सिलेंडरला आग लागली. फायर ब्रिगेडच्या डिपार्टमेन्टला नोंद आहे. गाड्या आतमध्ये जाउ शकल्या नाहीत. त्यांची कमान मोठी आहे. त्याबद्दल माझी काही तक्रार नाही. आपण ही पध्दत टाकली तर माझ्या वॉर्डमध्ये पण छोट्या छोट्या गल्लीत मी कमानी बनवून कोणाची तरी नावे टाकायला सुरुवात करेन. तुमच्या नगरविकास विभागातर्फे, नगररचनेतर्फे परवानगी दिल्या का? असे नाही. त्यांनी केले. आम्ही त्या नावाला सुध्दा तयार आहोत. आता तुम्हाला एवढी घाई झाली. आपल्या इकडे ग्राउंडला पुतळा झाला. तर, ठराव काय आहे? आणि त्या ठराव क्र. ५ चा सुचक मी आहे. त्याच्यामध्ये मिरा भाईंदरच्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांची नावे असली पाहिजे. अजून स्वातंत्र्यसैनिकांची नावे तिकडे लागलेली नाही. आम्हांला इकडचे महापौर, इकडचे सभापती स्वातंत्र्यसैनिकांपेक्षा मोठे झाले का? त्यांची नावे लागली. पण स्वातंत्रसैनिक आपल्या पंचक्रोशीत आहेत. त्यांची नावे लावा. स्वातंत्रसैनिकाचा एक छोटासा पुतळा तयार करा. के.डी.एम.सी. मध्ये तसे आहे. एक शहराची शान वाढवण्याकरिता, आज आमचे जे नेक्स्ट जनरेशन असते त्यांना काय कळणार की, आमच्या विभागामध्ये किती स्वातंत्र्यसैनिक आहेत? आत आमच्या मुलांना ह्या इकडचे नागरीक ते पुढे भविष्यामध्ये नगरसेवक होतील. तर ह्या शहराचा इतिहास कोणाला कळणार? सर्व धर्माचे, जातीचे, पंताचे सगळे स्वातंत्रसैनिक आहेत. त्यांची नावे लावावी. पण तीन वर्षे झाली त्यांची नावे नाही लागली. तर ते का नाही लागली? ह्याचे मला उत्तर द्या. बांधकाम खात्याच्या ठरावामध्ये नमुद आहे. श्री. मोहन पाटील ह्यांनी स्वतःच्या हट्टाने तिकडे एम.टी.एन.एल. समोर चबुतरा बांधला. २० लाख रु. महापालिकेचे फुकट गेले. मी पत्र दिले. सुचक, अनुमोदक यांच्याकडून पैसे वसुल करुन घ्या. त्या ठरवामध्येच बोललो होतो की, इथे पुतळा बसणार नाही. हा ठराव पास करु नका. पण आमच्यावर कुरघोडी करण्याकरिता तो ठराव केला आणि आज चबुतऱ्याला तीन वर्षे झाली. बांधून पडले आहे. २० लाख रु. महापालिकेचे फुकट गेले. कारण मोहन पाटील यांचा प्रपोजल होता. त्याचवेळी मी बोललो होतो की, बांधु नका. उद्या समजा रेल्वेचा एखादा ब्रिज डॅमेज झाला, काही झाले. असे सगळे होते. डॅमेज काही होत नाही असे नाही, सर्व डॅमेज होते. तुमची वाहतुकीची व्यवस्था काय?

**मा. सभापती :-**

मी त्यांना रिक्वेस्ट करतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही हे अंगावर घेउ नका. डिपार्टमेन्टचे अधिकारी मागे जाउन बसले. ते बोलत नाही.

**मा. सभापती :-**

आंबेडकरांचे नाव जे खाली आले त्यांना सांगतो की, पाटी लावून तुमचे नाव खाली घ्यावे.

**एस. ए. खान :-**

साहेब, तसे नाही. सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे तुमचे नाव काढायचे आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नाही. आम्ही का काढू. ह्याचा खर्च पालिकेने केलेला नाही. हा खर्च मी स्वतः केलेला आहे. पाहिजे तर अधिका-यांना विचारा.

**मा. सभापती :-**

स्वतःचा याचा अर्थ नगरपालिकेने केलेला आहे. शेवटी नगरपालिका हा निधी देते.

**मिलन म्हात्रे :-**

नगरसेवक निधी किती आहे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नगरसेवक निधीतून हे बनलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही बाजूला एक पाटी लावा. त्याच्यामध्ये तुम्ही सगळ्यांची नावे लावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्या हसनाळे मॅडम, मा. सभापती मॅडम जे सांगतात ना ते व्यवस्थित आहे. तुमच्या भावना काय आहे हा विषय वेगळा आहे. इतर महापालिकेकडून ते प्रोजेक्ट होते. जरी तुम्ही स्वागत करीत असला तरी महापालिकेने केले हे लक्षात येते. त्यांची अपेक्षा अशी आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाखाली त्याच बोल्ड मध्ये जे तुमचे नाव आहे तसे न राहता तुम्ही तुमचे स्वागत कॉर्नरला करु शकता.

**मिलन म्हात्रे :-**

कमान त्या नावाची पाहिजे. उद्या जर ह्या सभागृहाला नाव दिले. त्याचा सुचक ती तर माझे नाव टाकाल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पूर्ण डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेबांची कमान राहू द्या आणि ...

**मिलन म्हात्रे :-**

तो पारदर्शपणा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

चांगली सुचना आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्यांनी एक बोर्ड लावलेला आहे. आता हे काढू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

का नाही?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी काय बोलते की विषय कुठला आहे? आणि तुम्ही हा विषय मंजूर करायचा की नाही ते ठरवा. माझ्या वॉर्डमधला काढायचा की नाही ते आपण नंतर ठरवू. पहिला तुम्हांला हा विषय मंजूर करायचा का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय मंजूर करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय मंजूर कसा करणार?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मंजूर करायचा नसेल तर विरोध करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही चुकीच बोलायचे नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही चुकीचे कसे काय बोलता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अधिका-यांनी फक्त आमच्या प्रश्नाचा जवाब द्यावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही विरोध करा ना. तुम्हांला मंजूर नसेल तर तुम्ही विरोध करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमच्या प्रश्नाचा फक्त जवाब द्यावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ज्याला मंजूर करायचा त्यांनी मंजूर करा. ज्यांना मंजूर नाही करायचा त्यांनी विरोध करा.

**मिलन म्हात्रे :-**

तीन लाख २७ हजार रु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब सन्मा. सदस्य शरद पाटील साहेबांनी जो प्रश्न विचारला त्यांचे उत्तर द्या.

**मिलन म्हात्रे :-**

आता सांगितले ना की किती खर्च झाला ते खतगांवकर साहेब एक लक्षात घ्या आम्ही जे पत्र दिले त्यानंतर आमच्याकडे एक वाहतूक बेट बनवायला घेतले हे मला आठवते मला थोडा उशिर झाला, माझे रद्द करुन टाकले.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

बरोबर आहे. त्यावेळेला आम्ही जेव्हा ह्यांना साक्ष दिली. आणि आता जेव्हा आमचा विषय मंजूर करायचा त्यावेळेला हे करतात...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणाचे नाव आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नाव ह्याच्यावर देवू का?

**दिपक खांबित :-**

साहेब विषय असा आहे की नामकरणाचा प्रस्ताव फक्त मा. महासभेकडे शिफारस करायचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शिफारस करताना आम्ही बोलतो ना की त्या कमानीच्या खाली ज्या नगरसेवकांना येवून...

**शरद पाटील :-**

साहेब कशाला झगडे लावता, तुम्ही सगळे प्रश्न एकदा विचारायला सांगितले. प्रश्न उत्तरे व्हायला नको म्हणून तुम्ही सगळे प्रश्न एकदम विचारायला का सांगितले. एका एकाचे उत्तर देवू शकत नाहीतर तुम्ही पहिला ह्याचे उत्तर द्या.

**दिपक खांबित :-**

साहेब जे नामकरण झाले त्याबाबत तक्रारी प्राप्त आहे.

**शरद पाटील :-**

आपण मला पहिले हे सांगा की ३ लाख ३३ हजार रु. झाला का?

**दिपक खांबित :-**

२ लाख ९० हजार रु. झाली.

**शरद पाटील :-**

२ लाख ९० हजार रु. झाली बरोबर आहे. नियम काय आहे? आपले नाव कुठे लावायचे काय लावायचा तो पहिला आम्हांला नियम सांगा.

**दिपक खांबित :-**

त्याच्यापण जी.आर. आहे ना.

**शरद पाटील :-**

जी.आर. काय आहे तो सांगा. जी.आर. वाचून दाखवा.

**दिपक खांबित :-**

जी.आर. हा ठरावच आहे.

**मा. सभापती :-**

मा. महासभेमध्ये जी.आर. झालेला आहे.

**शरद पाटील :-**

जी.आर वाचून दाखवा ना. कसे लावायचे काय लावायचे.

**दिपक खांबित :-**

ग्रेनाईटची पाटी लावायची मग सगळ्यांची नावे यायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

तसे का नाही ते सांगा. नाव कोणाचे टाकायचे. आम्ही बोलत नाही. कोणाचे नाव टाकायचे आहे ते टाका.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही सांगा ना स्थानिक नगरसेवकाने केले तुम्ही कशाला हे करता.

**नयना म्हात्रे :-**

सगळ्यांची नावे म्हणजे नक्की कोणाकोणाची?

**दिपक खांबित :-**

मी तेच बोललो. जे नामकरण केलेले आहे. ते महानगरपालिकेने केलेले नाही. स्थानिक नगरसेवकांनी त्यांच्या खर्चातून केलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही जेव्हा नगरसेवक निधीतून जेव्हा पोलिस चौकी बांधली. तेव्हा संजय पांगेचे नाव एवढ्या मोठ्या अक्षरामध्ये लिहिले होते. तेव्हा आम्ही ऑब्जेक्शन घेतले का? आज तुम्हांला बरोबर सुचते ते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब आम्ही तुम्हांला एवढे सांगतो की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाच्याखाली ज्या पद्धतीने नगरसेवकांचे नाव टाकले त्यांची पण पाटी सन्मानाने लावावी. ग्रेनाईटची पाटी आणि दोन पिलर चे एका पिलरवर लावा. आमचा विरोध नाही.

**मा. सभापती :-**

हा ठराव आपल्या मा. महासभेसमोर ठेवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नाही. हा विषय स्थायी समितीला विरोध होतो का? किंवा काहीही होवू दे. एकतर मत पडेल किंवा मत पडणार नाही. पण तरीसुद्धा मला ठरावाचे वाचन करु दे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या ठरावात थोडी सुधारणा करुन घ्या आता नॅशनल हायवे क्र. ८ लोकेशन व्यवस्थित द्या. पुढे प्रॉब्लेम नको. त्या रस्त्याला नामकरण काय केले? जनता नगरचा जो रोड गेला. त्याचे नामकरण काय आहे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

धारावी मंदिर मार्ग आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो ह्याच्यात दिला आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नाही दिला.

**मिलन म्हात्रे :-**

मग तो लावून घ्या. नॅशनल हायवे क्र. ८ धारावी मंदीर मार्ग या रस्त्याला प्रमुख असलेली कमान असे लोकेशन व्यवस्थित द्या. त्यानंतर तुमचे जे उद्यान आहे. त्याच्यामध्ये सर्व्हे नं. टाका की ह्या सर्व्हे नं. मध्ये ह्या ह्या क्षेत्रफळाचे असलेले उद्यान त्याचे नामकरण असे व्यवस्थित गोषवारा मा. महासभेपुढे जाउ दे पुढे त्रासदायक होणार नाही. साहेब लोकेशन काहीच नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

हे बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही माझी सुचना आहे. ते दोन्ही नावे व्यवस्थित घ्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव व्यवस्थित आहे. सावित्रीबाई फुलेंचे पण नाव लागलं पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मागच्या सभेमध्ये सुद्धा काही ठराव नामकरणाचे प्रस्ताव पास झालेले आहे. तेव्हा तुम्ही काय केले?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महासभेला ते पण घ्या.

**दिपक खांबित :-**

सचिव विभागाकडे गोषवारा दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पुढच्या वेळी तुम्ही सगळं एकत्र घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब सध्या शहरामध्ये वाटेल तशा पाट्या महानगरपालिकेच्या खर्चाने लावल्या. त्याच्यावर कोणाचीही नावे आहे. साधू संत इतिहास पुरुष वगैरे सगळे. ती नावे रद्द करुन तुम्ही त्या पाट्या व्यवस्थित करा.

**मा. सभापती :-**

मा. महासभेपुढे देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेपुढे बांधकाम खात्याचा ठराव तसे आणले पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब ते नाव बरोबर आहे की चुकीचे एवढे उत्तर द्या ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब काम सांगतील. मी तुम्हांला सांगते. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत शासकीय महामार्ग क्र. ८ मध्ये जनता नगर येथे निलकमल नाका येथे मुख्य रस्त्यावर...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही अशा पद्धतीने भांडण लावायचा प्रयत्न केलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील रा. म. क्र. ८ वरील जनतानगर येथे निलकमल नाका येथे मुख्य रस्त्यावरती महानगरपालिकेमार्फत आर सी सी मध्ये प्रवेशद्वार बांधण्यात आलेले आहे. तसेच सन २००७-०८ या आर्थिक वर्षात साईकृपा कॉम्पलेक्स येथिल आरक्षित जागेत उद्यान विकसित करणेकामी मातीभराव करून कुंपनभिंत बांधण्यात आलेली आहे.

सदर जनतानगर मुख्य रस्त्यावरील प्रवेशद्वारास ‘‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार’’ असे नाव देण्यास तसेच साईकृपा कॉम्पलेक्स येथिल नव्याने विकसित करण्यात आलेल्या उद्यानास ‘‘सावित्रीबाई फुले उद्यान’’ असे नाव देणेबाबत मागणी करण्यात आलेली आहे.

तरी जनता नगर मुख्य रस्त्यावरील प्रेवश व्दारास ‘‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार’’ व साईकृपा कॉम्पलेक्स येथील नव्याने विकसित करण्यात आलेल्या उदयानास ‘‘सावित्रीबाई फुले उदयान’’ असे नामकरण करण्याचा प्रस्ताव अंतिम मंजूरीकरीता मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे.

**प्रकाश ठाकुर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब ह्या ठरावामध्ये ह्या कमानीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ठिकाणी जे नगरसेवकांचे नाव मोठ्या अक्षराने खोडलेले आहे ते नाव काढून टाका...

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ते नाव काढून ओमप्रकाश अग्रवाल त्यांचे नाव टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते नाव काढून टाका. अशी आम्ही सुचना मांडत आहे. खांबित साहेब तुम्ही जर ह्या पद्धतीने सभा चालवत असाल ना तर हे चुकीचे आहे तुम्ही सांगा ना हे नाव चुकीचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे पहा त्यांनी सांगितले की हे नाव महापालिकेकडून टाकलेले नाही ते स्वतः सदस्य बोलले आहेत त्यांनी स्वतः नाव टाकलेले आहे आता हा विषय क्लिअर झालेला आहे. आता तुम्ही ठरवा काय करायचे ते मग प्रशासन तशी कारवाई करेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उद्या महापालिका नाव आम्ही खोडले तर भारतीय जनता पार्टी ने नाव खोडले तर तुम्ही कारवाई करणार नाही. आपण असे कसे बोलता?

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचा विरोध फक्त त्या ठिकाणी. आता जोडलेले नाव ही आमची सुचना घ्या ना.

**मा. सभापती :-**

हमने यहा से सुचित किया था की मा. महासभेने जो ठराव पास है तो उस हिसाब से हो जायेगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याच्यामध्ये आमची सुचना घ्या मग ठराव मांडा.

**शरद पाटील :-**

साहेब मी काय सांगतो की जर हा विषय असाच चालू राहिला ना तर उद्या सगळी नावे टाकतील. तेव्हा तुम्ही कोणाला रोकू शकत नाही. आम्ही सांगतो. नियमाच्या बाहेर कोण जाईल त्याला आपण रोकू शकत नाही. आम्हांला दुसरे काही बोलायचे नाही. नियमानुसार करा आम्ही तुम्हांला ते पण सांगत नाही पण उद्या आम्ही पण कमानी देणार आहोत तेव्हा आम्ही आमची नावे टाकू तेव्हा सांगायचे नाही की हा नियम नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही घ्या.

**मा. सभापती :-**

तुम्ही पुढचा विषय घ्या ठराव मंजूर केलेला आहे पुढचा विषय घ्या.

**शरद पाटील :-**

साहेब आम्हांला पहिले ह्याचे उत्तर द्या. उद्या आम्ही कमानीची परवानगी देवू आणि आमची नावे टाकू त्यावेळेला ह्या गोष्टीला विरोध झाला नाही पाहिजे.

**मा. सभापती :-**

मा. महासभेत विरोध झाला तरच ते बघायचे.

**शरद पाटील :-**

मा. महासभेत जर विरोध झाला नाही...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमची सुचना घ्या ना. तुम्ही उद्या कोणी सुचना नाही केली. मग आम्ही सुचना करतो ना तुम्ही आमची सुचना घ्या.

**शरद पाटील :-**

तुम्ही प्रशासनानी  तसे उत्तर द्या. की हे नियमात आहे आणि आम्ही दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

त्यांनी सांगितले ना की...

**शरद पाटील :-**

त्यांना तसे माईक वर बोलू द्या.

**मा. सभापती :-**

बोलले ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब हा विषय मा. महासभेपुढे जावू द्या. मा. महासभा जे ठरवेल ते आम्हांला चालेल ते मला मान्य आहे.

**शरद पाटील :-**

कमानी बांधायची हे आपल्या नियमात आहे ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्या वेळेला विरोध झाला नाही.

**शरद पाटील :-**

मला कमानी बांधून दिली नाही आणि मी तुमच्या कमानीचे बोलत नाही मला कमानीची परवानगी दिली नव्हती म्हणून मी आता बोलतो. म्हणजे एकाला देणार एकाला नाही देणार असे आहे का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ज्योत्स्ना हसनाळे ह्यांनी मांडलेल्या ठरावाला मी मान्यता देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमची सुचना घेणार का नाही? मा. सभापती साहेब आम्ही सुचना केलेली आहे. तुम्ही सुचनांची नोंद घ्या.

**प्रकाश ठाकुर :-**

सुचनेला विरोध आहे.

**मा. सभापती :-**

तुमची सुचना द्या. ते टेपमध्ये रेकॉर्डींग होते.

**शरद पाटील :-**

तुम्ही घेता की नाही ते सांगा? जर तुम्हाला सुचना घ्यायची नाही तर नाही म्हणून सांगा.

**प्रशांत पालांडे :-**

खतगावकर साहेब, एवढेच क्लिअर सांगा की, आम्ही नगरसेवक निधीतून ह्याच्यपुढे कमानी  बांधु शकतो की नाही ते क्लिअर सांगा.

**दिपक खांबित :-**

२००१ चा जी.आर. आहे. त्याच्या कॉपी आम्ही सर्व नगरसेवकांना पाठवतो आणि ह्याच्यापुढे जी.आर. ची काटेकोरपणे .....

**शरद पाटील :-**

त्याच्यापुढे नाही. त्याच्यानंतर आलेली आहे.

**दिपक खांबित :-**

त्याच्यावर अंमलबजावणी केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

खतगावकर साहेब, एवढे लक्षात घ्या की, जी.आर. २००१ सालचा आहे. आम्ही २००० ची गोष्ट करत नाही. २००१ नंतर जे जी.आर. आपल्याकडे आस्थापनेला येतात. ते बांधकाम विभागाने त्याच्यावर इम्प्लीमेन्टेशन करण्याकरिता तुम्हाला दिलेले असतात ना. आज त्याच्या कॉपी सिटी इंजिनियर कार्यालयामध्ये

पाहिल्या. समजा मी उद्या एखादे काम सुचवले तर त्यांनी पाहिले त्या जी.आर. मध्ये आहे की नाही ते बघितले पाहिजे आणि ते जर नसेल तर मला तसे कळवले पाहिजे की, ह्या जी.आर. नुसार हे बंधन आहे. ह्या जी.आर.मध्ये हे काम नाही आणि जर असेल तर सिरीयल नं. सो ॲन्ड सो मध्ये हे काम आहे तर आपल्याला कामाला मंजुरी देत आहोत. व्यवस्थित पाहिजे. मागच्या वेळेला पण असेच झाले. त्या कंपाउंड वॉलकरिता बराच वाद झाला. हे सगळ जी.आर. मध्ये आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, दुसरं नाही पण तुम्ही आम्हाला ह्या विषयावर क्लिअर कट उत्तर दिले पाहिजे आणि ते प्रोसिडींगमध्ये आले पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांनी सांगितले ना की, कमानी बांधु शकतो.

**दिपक खांबित :-**

जी.आर. मध्ये आहे.....

**शरद पाटील :-**

तो जी.आर. आता मागवा आणि आम्हाला क्लिअर करा.

**दिपक खांबित :-**

आम्ही जी.आर. मागवलेला आहे.

**शरद पाटील :-**

मी ह्याच्यापुढे बोलतो. झाले ते झाले.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, २००१ चा तो जी.आर. आहे.

**शरद पाटील :-**

२००१ नंतर जे झाले असेल त्याच्यावर तुम्ही कारवाई केली की नाही ते सांगा. तुमच्याकडे जी.आर. कधी प्राप्त होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग हे काम कोणाचे आहे? तुमचे आहे का? मा. महासभेचे आहे का?

**शरद पाटील :-**

२००१ साली जो जी.आर. निघतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जी.आर. बघण्याचे काम कोणाचे आहे? किंवा आणायचे कोणाचे काम आहे. महाराष्ट्र शासनाने जी.आर. पाठवलेला नाही असे बोला ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय संपला पुढचा विषय घ्या.

**शरद पाटील :-**

अजून विषय संपलेला नाही. मला परवानगी नाकारल्यावर तुम्ही असे बोलता? आम्ही चौपाटीवर कमानी बांधत होतो. तेव्हा आम्हाला परवानगी दिली नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सर्व नगरसेवकांना नगरसेवक निधीचा जी.आर. पाठवून द्या.

**शरद पाटील :-**

साहेब, आम्हाला एकदाही कमानी बांधायला परवानगी का दिली नाही?

**मा. सभापती :-**

तुम्हाला कुठे बांधायची आहे?

**शरद पाटील :-**

चौपाटीवर बांधायची आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

बांधा ना.

**मा. सभापती :-**

कुठल्या निधीतून बांधायचे आहे.

**शरद पाटील :-**

नगरसेवक निधीतून बांधायचे आहे. जे काही लागेल ते आम्ही पाच जणांचा नगरसेवक निधी आहे.

**मा. सभापती :-**

जो किती करोडोचा आहे?

**शरद पाटील :-**

चौपाटीचे नाही बोलत. कमानीची गोष्ट आहे.

**मा. सभापती :-**

मग, कमानी बांधायची होती.

**शरद पाटील :-**

पण, आम्हाला परवानगी दिली नाही. साहेब आम्ही कोणाच्या नावाचा विरोध करत नाही.

**मा. सभापती :-**

तिकडे एका नगरसेविकेचे काम असते. तिकडे तिच्या वॉर्डमध्ये काम केलेले आहे.

**शरद पाटील :-**

आमच्या वॉर्डमध्ये देणार का?

**मा. सभापती :-**

काय?

**शरद पाटील :-**

कमानी बांधायला देणार का?

**मा. सभापती :-**

तुमच्या वॉर्डमध्ये उद्यान बांधा आणि लावा.

**शरद पाटील :-**

उद्यानचे नाही. आमच्या येथे कमानी बांधायला देणार का? तुम्ही आम्हाला एवढे सांगा की, तुम्हाला आम्ही कमानी बांधायला देणार असे जाहिर करा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आपली प्रशासनाची भूमिका स्पष्ट सांगा.

**शरद पाटील :-**

परवानगी देणार की नाही? एवढे तरी सांगा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

प्रशासन काही सांगतच नाही. आमच्यात वाद होतो. मी या ठरावाच्या अनुसरुन सांगतो की, हे काशिमिराचे गेट आहे ना. आपल्याला काशीमिऱ्याच्या येथे गेट बसवायचे आहे. ह्यात आमच्या सर्वांचा निधी देतो.

**शरद पाटील :-**

साहेब, आम्हाला कमानी बांधायला देणार का?

**दिपक खांबीत :-**

प्रस्ताव तपासून घ्यावा लागेल.

**शरद पाटील :-**

या प्रस्तावाला काय काय लागते? कुठच्या कुठच्या बाजू लागतात त्या पण सांगा. तुम्ही मला सांगा ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, नगरसेवक निधीचा जो जी.आर. आहे. त्याच पध्दतीने तुम्ही पुढच्या नगरसेवकाचे काम करा. मला जर ही कल्पना दिली तर मी पण बांधला नसता. पण, मला त्यावेळेला कोणी विरोध केला नाही.

**शरद पाटील :-**

आम्हाला कमानी बांधून देणार की नाही? त्याचे उत्तर द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रस्ताव दिला होता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

प्रस्ताव दिला होता. त्यामुळे त्यावेळेला विरोध झाला नाही.

**शरद पाटील :-**

म्हणजे आता आम्ही बांधयला लागलो तर आम्हाला नियम दाखवणार.

**प्रशांत पालांडे :-**

मी काय म्हणतो की, वेगवेगळ्या ठिकाणच्या कमानीचे नियम बदलतात काय? आता ह्या मॅडमने बांधले ना. उद्या आम्हाला बांधायचे असेल तर परवानगी मिळणार की नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नगरसेवक निधी ही लोकांच्या कल्याणासाठी, लोकांच्या निडफुल कामासाठी वापरायला पाहिजे. जनतेसाठी तुम्हाला जे अत्यावश्यक कामे असतात त्याच्यासाठी वापरायला पाहिजे. कमान हे एक्स्ट्रॉनरी काम झाले. आता तुम्ही हे ठरवायला पाहिजे की, आपण कशासाठी वापरायचे.

**शरद पाटील :-**

आम्ही आता काही ठरविणार नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्या आणि ह्याच्यासाठी धोरणात्मक निर्णय घेता येईल. त्याची कॉपी आम्ही सर्वांना देवू.

**शरद पाटील :-**

खतगांवकर साहेब, जे ठरलेले आहे ना आणि ह्यांनी आता बांधलेले आहे ना. तर सगळ्यांना बांधू द्या.

**मा. सभापती :-**

तुमची सुचना काय आहे ते होवू द्या.

**शरद पाटील :-**

त्यांनी सुचना मांडली.

**मा. सभापती :-**

त्यांनी मांडली आता तुम्ही सुचना मांडा.

**शरद पाटील :-**

सुचना त्यांनी मांडली. तो विषय त्यांचा आहे. माझी फक्त एवढीच सुचना आहे की, तुम्ही कमान बांधून देणार की नाही? आमच्या नगरसेवक निधीतून कमान बांधून देणार की नाही? साहेब, त्याचा खुलासा करावा. साहेब असे होत नाही. आम्हांला कमान बांधून देणार की नाही?

**मा. सभापती :-**

तुम्हांला उद्यान बांधायचे असेल तर बांधा.

**शरद पाटील :-**

आमच्याकडे उद्यान बांधायला जागा नाही. कमान बांधायला जागा आहे.

**मा. सभापती :-**

उद्यान बांधा ना.

**शरद पाटील :-**

साहेब, ती कमान उद्यानमध्ये नाही. उद्यान वेगळे आहे कमान वेगळी आहे. आम्हाला कमान बांधून देणार की नाही. ह्याचे उत्तर द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी उद्यानामध्येसुध्दा कमान बांधले. पाहिजे तर जावून बघा. ती पण छान बांधली आहे.

**मा. सभापती :-**

जर तुम्हाला विरोध करायचा असेल तर करा.

**शरद पाटील :-**

आमचा विरोध नाही.

**प्रशांत पालांडे :-**

आम्हाला धोरणात्मक निर्णय द्या की, कमान बांधू शकतो की नाही?

**मा. सभापती :-**

हा विषय मा. महासभे पूढे पाठवतो. तिकडे निर्णय होईल ना.

**शरद पाटील :-**

ह्यांना कमाना बांधायला दिली मग आम्हांला का नाही.

**मा. सभापती :-**

मा. महासभेत ह्याचा निर्णय होईल की नाही.

**शरद पाटील :-**

पण तुम्ही आम्हाला बांधायला नाही का बोलता?

**मा. सभापती :-**

मा. महासभेत निर्णय होईल तर तुम्हाला मा. महासभा निर्णय देईल.

**दिपक खांबित :-**

हा प्रस्ताव आपण आता मा. आयुक्त साहेबांकडे देवू या. मग मा. आयुक्त निर्णय देतील.

**मा. सभापती :-**

हो. मा. आयुक्त साहेब निर्णय देतील.

**शरद पाटील :-**

तसे नाही. ते जेव्हा निर्णय देतील तेव्हा देतील, ते आम्ही बघू. खांबित साहेब तेवढा नियम आम्हाला शिकवू नका. आम्हाला तेवढी अक्कल आहे. तुम्ही सांगा ना की, कमानी बांधायला देणार म्हणून. उत्तर द्या ना. कमानी बांधून देणार की नाही एवढे सांगा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्यावेळेला मी प्रस्ताव पाठवलेला होता. मा. आयुक्त साहेबांनी मंजूरी दिली होती.

**शरद पाटील :-**

कमान बांधणे हे नियमात आहे की नाही हे आम्हाला सांगा.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ज्यावेळेला सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे मॅडमने निधीतून काम केले होते. तेव्हा स्थायी समितीने मंजूरी दिली असेल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

दिलेली आहे.

**नयना म्हात्रे :-**

मग, आता आपण किती बडबड करायची.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मंजुरी दिलेली आहे आणि त्याची सगळी प्रोसिजर झालेली आहे. आणि नगरसेवक निधीतून काम झालेले आहे.

**शरद पाटील :-**

आम्ही कमानीला नाही बोलत नाही. आम्हाला कमानी बांधून देणार की नाही. एवढे आम्ही विचारतो.

**प्रशांत पालांडे :-**

खांबित साहेब, २००१ मध्ये आहे की नाही एवढे सांगा. मग विषय संपला.

**दिपक खांबित :-**

मी बघून सांगतो.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही अजून बघितलेले नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, त्यांनी सांगावे ना की कमानी बांधा म्हणून.

**दिपक खांबित :-**

प्रस्ताव येईल .....

**शरद पाटील :-**

प्रस्ताव येईल. कमान बांधू म्हणून सांगा. नंतर काय उत्तर द्यायचे ते आम्ही बघू.

**दिपक खांबित :-**

जी.आर. प्रमाणे......

**शरद पाटील :-**

जी.आर. प्रमाणे बोलता, तर आम्हाला जी.आर. आणून आत्ताच्या आत्ता आणून दाखवा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यावेळेस त्यांनी प्रस्ताव केला. तेव्हा कार्यकारी अभियंतानीं मा. आयुक्त साहेबांकडे सादर केले. मा. आयुक्त साहेबांनी त्याला मान्यता दिली.

**शरद पाटील :-**

तेव्हा जी.आर. नव्हता का?

**दिपक खांबित :-**

त्यावेळेला आमची अशी मिटींगसुध्दा झाली. त्यावेळेला मी हाईट बघितलेली किती आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आणि हायवेची रुंदी सोडून

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्त साहेबांकडे सादर केलेली आहे.

**शरद पाटील :-**

तुमचा तो बरोबर विषय आहे. पण नंतर तुम्ही जी.आर. चा मुद्दा आणायचा नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्यावेळेला मला जी.आर. दाखवला असता तर मी कमानी बांधली नसती. तुम्ही कशाला हे करता.

**शरद पाटील :-**

तुम्हाला जे बोलायचे आहे ते बोला.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तेच तर सांगते ना. तुम्ही कमानी वगैरे करता ना. जर, त्यावेळेला मला जी.आर. दाखवला असता तर मी सुध्दा जी.आर. बांधला नसता ना. पण मला त्यावेळेला मला असे कोणी सांगितले नाही. त्यामुळे ते बांधल गेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब, अत्यावश्यक कामे करा. इनकेस तुम्हाला कुठे कमान बांधायची असेल तर तुम्ही तसा प्रस्ताव द्या. मा. आयुक्त साहेब त्याच्यावर निर्णय घेतील.

**शरद पाटील :-**

कमान सोडून द्या. माझ्या दोन विषयाला ह्या लोकांनी नकार दिला. नंतर तेच विषय ह्या लोकांनी तिथे लावून घेतले. आता जावून दाखवू का? मला लेखी पत्र दिलेले आहे की, करता येत नाही म्हणून. आणि त्यांना दिलेले आहे तर मग काय करायचे. कमानीचा विषय सोडून द्या. म्हणजे काय तुम्ही माणूस बघून पुढे जाता का? अधिकारी म्हणून.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य आपण असा ठराव मांडा की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव असो. असा आपण ठराव मांडा.

**शरद पाटील :-**

ठरावाला माझा विरोध नाही. म्हणजे तुम्ही गि-हाईक म्हणून पुडी बांधता का येथे? आम्हाला काय लल्लु नगरसेवक समजता का? म्हणजे जो बोलेल त्याचे फक्त ऐकायचे. जो विरोध करेल त्यांचे फक्त ऐकायचे. जो बोलणार नाही त्यांचे ऐकायचे नाही. असे आहे का? मी तुम्हाला सांगतो की, आजसुध्दा माझ्याकडे ते पत्र आहे. रोडला जे खांबे लावायचे होते आणि जिथे हॉस्पीटल आहे तिथे हे करायचे होते. त्याचे मला लिखित दिले की, हे नगरसेवक निधीतून करु शकत नाही. आज तेच दुस-या नगरसेवकाने केले तर करुन दिले. आम्ही बोलत नाही म्हणून का? आम्ही काय बोलतो जावू दे. एवढ्याशा विषयावर एखाद्या अधिका-यावर हे करायचे आणि करायचे. म्हणजे आम्ही उल्लु आहोत का? नगरसेवक म्हणून आम्हाला अक्कल नाही का? आम्हाला डोकं नाही का? ह्या इलेक्शनला मी काय भोगलं ते मला माहित आहे. जे काम मी .....

**मिलन म्हात्रे :-**

केला नाही पाहिजे हे लक्षात घ्या. दरवेळेला आम्हालासुध्दा अशी पत्र येतात की, ह्या कामाची तरतुद नाही. अधिका-यांनी कुठेही वस्तुस्थिती लपवू नये. माझ्या वॉर्डमध्ये सुध्दा इलेक्शनच्या अगोदर आम्हीला लेखी दिले आहे. ह्या कामाची तरतुद नाही. अमुक नाही. क्वान्टीटी संपली. इलेक्शन झाल्यानंतर विदाउट टेंडर काम सुरु झाले. आम्हाला कळत नाही का? मग तक्रारी केल्या की, अधिका-यांनी धावत सुटावे. मा. सभापती साहेब हे चालायचे नाही. प्रत्येक सोसायटीमध्ये सुध्दा पेवर ब्लॉक वगैरे लावले गेले. एकीकडे नियम जी सोसायटी तुम्हाला ताबा पावती देणार नाही. तिकडे कुठे ही पेवर ब्लॉक महानगरपालिकेचे लागले नाही पाहिजे हा नियम आहे. तुम्ही स्ट्रीट लाईट लावता. आम्ही सांगितले तर सांगणार की ताबा पावती पाहिजे. एकीकडे निराळे नियम, दुसरीकडे निराळे नियम. आम्हांला सांगणार क्वांन्टीटी संपली. इलेक्शन आले रिझल्ट लागल्या बरोबर कामाला सुरुवात. म्हणजे काय? मी तुम्हाला माझ्या वॉर्डमध्ये सांगतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, मी उद्या काही पत्र आणणार. म्हणजे तुम्ही प्रशासकांनी कार्यकारी अभियंता म्हणून हा प्रस्ताव पाठवलेला आहे. त्यांनी वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. त्याठिकणी असे असे नाव झालेले आहे. पण त्याठिकाणी हे होणार आहे आणि त्यावेळेला फक्त मान्यता द्यायची आहे. म्हणून हा प्रस्ता आहे. एक तर हे नाव झालेले आहे त्या नावाचा चुकीचा दुरुपयोग केलेला आहे आणि तुम्ही आमच्याकडून पुन्हा ठराव मागता म्हणजे अधिकारी काय आम्हाला प्रत्येकवेळी अडकवायला बघतात का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कुठले नावाचा चुकीचा दुरुपयोग झाला? तुम्ही काय पण बोलता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही टिपणी देताना विचार केला का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुमचा विरोध असेल तर विरोध मांडा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जिकडे नाव नसते, तिकडे नाव झालेले आहे. आम्ही आजही सांगतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव राहू द्या. इकडे स्पष्ट सांगितले पाहिजे. असे असे नाव आहे. ह्या खाली असे असे नाव आहे. त्या नावाच्या प्रस्तावाला आम्ही मान्यता द्यावी. आम्ही आमचा विरोध नोंदवला असता की, फक्त ह्या नावाकरता विरोध आहे. पण प्रशासन प्रत्येकवेळी आपली बाजू सरस ठेवून आमच्यामध्ये भांडण लावायचा प्रयत्न करतात. मी अजुनही सांगतो की, शहर अभियंताने ह्याच्यात दुरुस्ती करावी. तुमच्या नजरेखाली .....

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, सावित्रीबाई फुले उद्यानाला अजून नामकरण झालेले नाही. त्यावेळेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांची जयंती होती. म्हणून पत्र आधी दिले होते. परंतु, आपला तो विषय घेण्यात आला नाही. म्हणून .....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगावकर साहेब, एकतर महानगरपालिकेच्या नियमाच्या विरुध्द जावून कोणी कुठेही नाव लावले. आणि अधिकारी झोपलेला आहे. ही गंभीर बाब आहे. उद्या महापालिकेच्या कार्यालयातील आणि भारतीय जनता पार्टी कार्यालयाचे नाव लावू. तेव्हा तुम्ही काही बोलणार नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

लावून तर दाखवा. बोलायच्या गोष्टी कशाला करता. तुम्ही निवडून आलात ना. मग तुमचा झेंडा फडकवा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अधिका-यांनी ह्याच्यावर खुलासा करावा. हा प्रस्ताव त्यांनी आणलेला आहे की, नगरसेवकाच्या पत्रावरुन प्रस्ताव आणलेला आहे.तर त्या नगरसेवकाचे पत्र येथे ठेवावे, त्यांनी प्रस्ताव द्यायचा नाही. तर त्यांनी प्रस्ताव दिलेला आहे तर त्यांनी त्या बाबींचा पूर्ण उल्लेख करावा. ह्या ठिकाणी कमानी बांधली. नगरसेवक निधीतून बांधलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने त्या ठिकाणी नाव देण्यात आलेले आहे. त्याठिकाणी असे असे नाव देण्यात आलेले आहे. ह्या दोन्ही नावाला मान्यता देवून मा. महासभेपुढे जायचे. त्यांनी असे सांगितले असते तर आम्ही आमची बाजू मांडली असती. तुम्ही चुकीची पध्दत कशाला घेता. म्हणजे आमच्या नगरसेवकांमध्ये भांडणे लावायचे तुमचे काम आहे. अजून महापालिकेच्या अधिका-यांचे भांडण संपले नाही का? तुम्हाला भांडणे लावायची आहेत तर लावा. आम्ही तुमच्यामध्ये भांडणे लावतो. तुमचे भांडण संपले नाही का? म्हणून आमच्या कार्यकारी अभियंतानी ह्या टिपणीवर पूर्णपणे खुलासा करावा. नंतर ठराव मांडा. खतगावकर साहेब, आपण प्रशासन अधिकारी म्हणून बसेलले आहेत. असे चुकीचे प्रस्ताव आणू नये. उद्या कोणीही काहीही करेल. आम्ही आजही सांगतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे, ज्योतिबा फुले ह्यांचे नाव एक ठिकाणी नाव नाही, दहा ठिकाणी नाव लिहा आणि ह्या सभागृहामध्ये त्योवळी आम्ही मान्यता दिलेली आहे. जेव्हा विरोध चालला होता. मी प्रोसिडींग बघायला गेलो होतो. ह्या महापालिकेच्या परिसरामध्ये पुतळा आणि फाटकावरच्या पुतळ्यावरुन वाद झाला होता......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन्मा. सदस्यानी ह्या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे त्या अनुषंगाने मी मा. सभापती साहेबांच्या परवानगीने थोडस विवेचन करतो. त्या ठिकाणी जी कमान तयार झालेली आहे ते नगरसेवक निधीतून तयार झालेली आहे. ते प्रशासनाने आपल्याला अवगत केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण हा विषय झालेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

हा विषय मंजुर झालेला आहे. मग पुन्हा तो विषय चर्चेला का येतो? ठराव झालेला आहे. ठरावाला विरोध करायचा आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मी प्रशासनाकडून थोडासा खुलासा करतो आणि तिथली जी वस्तुस्थिती आहे. त्या कामानीच्या नावाची जी वस्तुस्थिती आहे. प्रशासनाने मा. आयुक्त साहेबांसमोर सादर केलेली आहे. लेखी सादर केलेली आहे. तद्नंतर मा. आयुक्त साहेबांनी ह्याला मान्यता दिल्यानंतर हा विषय येथे आलेला आहे. आता त्यामध्ये सन्मा. सदस्याचे जे नामांकन आहे, ती वस्तुस्थिती आहे. त्याच्यावर सुध्दा मा. महासभेचा निर्णय झाल्यानंतर मी त्याबाबत निर्णय घेतो. काढून घेतो. जर मा. महासभेने निर्णय नाही केला तर ते विवेचन केलेले आहे हे सर्व मिनिट्सला आलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मग, अजून करायला पाहिजे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. सभापती साहेबांनी मंजुरीसुध्दा दिलेली आहे. तो विषय रेकॉर्डवर घेतलेला आहे की, विना मंजुरीने तिथे नाव लावलेले आहे. हे काय कोणी लपवून ठेवलेले नाही. मंजुरी नसताना देखील त्यांनी नाव टाकलेले आहे. हे रेकॉर्डला आलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये विषय का नाही आला?

**शरद पाटील :-**

बिना मंजुरीने नाव टाकलेले आहे. तर त्याच्यावर काय केले?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

म्हणून स्थायी समितीमध्ये विषय घेतला.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीपुढे हा प्रस्ताव आधी केला. नामकरण नंतर जागेवर झाले. त्यांनी जो बोर्ड लावलेला आहे ना .....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कसला?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी आधी मंजुरी मागितली होती. पण तो विषय स्थायी समितीमध्ये विषय आला नाही. त्यानंतर जयंती होती. त्यामुळे आम्ही ते केले.

**शरद पाटील :-**

आमचा ह्यात विरोध नाही. तसा काही प्रश्न नाही. खांबित साहेब हे तुम्हाला पक्कं माहित आहे की, आपला जी.आर. सोडून द्यावे. जी.आर. चे बोलू नका की, पहिला आला की दुसरा आला की तिसरा आला किंवा पाचवा आला. पण आपला जेव्हा जी.आर. असतो ना ते जी.आर. कसे आहे की कुठेही नावाची पाटी लावायची असते. आपला ठराव काय आहे? महापालिकेने केलेला ठराव आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब ऐकून घ्या. त्यांच्या नावाच्या हरकती बद्दल आलेले आहे. आणि सन्मा. सदस्यांना आम्ही मा. आयुक्त साहेबांकडे बोलावून परत आम्ही चर्चा करु. मा. महासभेला हा विषय येण्यापूर्वी परत आम्ही सामुहीक पध्दतीने घेवून येवू.

**शरद पाटील :-**

त्याच्यावर आपल्या महापालिकेचा ठराव आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नगरसेवक निधीचे नामफलक वेगळे आहे.

**दिपक खांबित :-**

गोषवारा आधी केलेला आहे आणि बाकीच्या गोष्टी नंतर झालेल्या आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

गोषवारा हा पूर्वी आलेला आहे आणि नंतर त्यांचे ......

**दिपक खांबित :-**

आम्ही मा. आयुक्त साहेबांकडे टिपणी टाकलेली आहे. त्याचा निर्णय होईल.

**शरद पाटील :-**

तुम्हाला एवढं शॉर्ट उत्तर द्यायचे होते. कशाला एवढे लफडे झाले असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही हे ते करता ना ते चुकीचे करता. ह्याच्यात उल्लेख का केला नाही?

**दिपक खांबित :-**

गोषवारा आधी दिलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आधी कधी दिलेला आहे? चार दिवसापूर्वी आम्हाला गोषवारा दिलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, मिरा भाईंदरमध्ये जेवढी नामकरणं झालेली आहेत त्याची संपूर्ण मला डिटेल पाहिजे. आम्ही तुम्हाला पत्र दिलेले आहे. पत्र देवून एक महिना झालेला आहे. मला उत्तर मिळालेले नाही. अशी नामकरण किती झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. आयुक्त साहेबांकडे ज्यावेळी आपली बैठक होईल ना ......

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्या नामकरणाचा प्रस्ताव मा. महासभेपुढे आणा.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेबांचे मी कधी कधी खरोखरच मी अभिनंदन करतो. म्हणजे माझ्या डोळ्याने बघितले आणि कानाने ऐकले असे आहे. एक बाई आली ती बोलते मला टपरी बांधायची आहे. ते बोलले की, कुठे बांधायची आहे. तुम्ही मला जागा सांगा. ती बोलते एकच जागा खाली आहे. कुठे आहे? माझे डोके आहे त्याच्यावर ठेवा असे तो बोलतो. म्हणजे त्या बाईला सांगायला लागले, ती बाई सरळ उठून निघून गेली. बरोबर आहे ना. आपल्याला कुठे टपरी शहर बनवायचे आहे. साहेब, जेव्हा आपला पूर्ण ठराव असताना टपरी हे ज्या ना फेरीवाला रस्त्याला आहे. तिथे टपरी द्यायची नाही. तिथे आता पण टपरीला परमिशन दिलेली आहे का? तिकडचे स्थानिक नगरसेवक वेतोसकर आणि नलावडे ही होते. त्यांनी मला फोन केला की, ह्याचे काय? मी बोललो माझा ह्याच्यात काही संबंध नाही. तुम्हाला काय करायचे ते करा.

**प्रकरण क्र. ०६ :-**

नामकरण प्रस्तावास मान्यता देणे.

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील रा. म. क्र. ८ वरील जनतानगर येथे निलकमल नाका येथे मुख्य रस्त्यावरती महानगरपालिकेमार्फत आर सी सी मध्ये प्रवेशद्वार बांधण्यात आलेले आहे. तसेच सन २००७-०८ या आर्थिक वर्षात साईकृपा कॉम्पलेक्स येथिल आरक्षित जागेत उद्यान विकसित करणेकामी मातीभराव करून कुंपनभिंत बांधण्यात आलेली आहे.

सदर जनतानगर मुख्य रस्त्यावरील प्रवेशद्वारास ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार'' असे नाव देण्यास तसेच साईकृपा कॉम्पलेक्स येथिल नव्याने विकसित करण्यात आलेल्या उद्यानास ''सावित्रीबाई फुले उद्यान'' असे नाव देणेबाबत मागणी करण्यात आलेली आहे.

तरी जनता नगर मुख्य रस्त्यावरील प्रेवश व्दारास ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार'' व साईकृपा कॉम्पलेक्स येथील नव्याने विकसित करण्यात आलेल्या उदयानास ''सावित्रीबाई फुले उदयान'' असे नामकरण करण्याचा प्रस्ताव अंतिम मंजूरीकरीता मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्योत्सना हसनाळे          अनुमोदक :- श्री. प्रकाश ठाकुर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७, भाईंदर (प.) नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात जॉगिंग ट्रॅक तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर (प.) येथे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान हे एकमेव मैदान असून सदर मैदानात जॉगिंग ट्रॅक करणे बाबत स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येत आहे. सदर ठिकाणी ४१० मीटर X १.८० मीटर रूंदीचे जॉगींग ट्रॅक तयार केल्यास सकाळच्या वेळेस मॉर्निंग वॉक करिता येणाऱ्या नागरिकांची चांगली सोय होईल. सदर कामी रू. १०,९१,१०५/- एवढा खर्च अपेक्षित असुन स्टेडीयम / क्रिडा संकूल या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चाच्या अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला फक्त ह्याच्यामध्ये हे सांगा की हा प्रस्ताव कोणी दिलेला आहे किंवा प्रशासनाने तयार केला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागच्या वेळेला आपली येथेच चर्चा झालेली होती. बजेटच्यामध्ये चर्चा झाली होती.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

चांगल्या कामाला विरोध कशाला करता? हे चांगले काम आहे. हे काम झाले पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याला माझा विरोध नाही. जेव्हा ह्या सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये ह्यापूर्वी प्रथम स्टेज बांधण्याचा विचार होता. तर ही स्टेडीयमसाठी जागा आहे. तर येथे कुठली जॉगींग ट्रॅक बांधयचे नाही. अशी चर्चा होत होती. आज कोणी प्रस्ताव दिला आहे का की, प्रशासनाने आणला आहे.

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांना आम्ही चार तारखेला पत्र दिले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कधीतरी आपण येथे स्टेडीयम बांधले तर तुम्ही जॉगींग ट्रॅक बांधता. म्हणजे स्टेडीयम बांधणा नाही. हे नक्की झालेले आहे. मी तुम्हाला फक्त हेच विचारतो. बाकी आमचा विरोध नाही. इकडे स्टेडीयम बांधायचा प्रस्ताव आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

जॉगींग ट्रॅक बांधला म्हणून स्टेडीयम बांधायचे नाही असे थोडेच आहे. स्टेडीयम बांधायचे आहे. ती सर्व जागा आपल्या ताब्यात आहे.

**प्रशांत पालांडे :-**

स्टडीयम बांधले तर फुकट जाईल का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा जो जॉगींग ट्रॅक बांधणार आहे तो कशाला बांधणार आहे?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आमचा त्याला विरोध नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आमचा त्याला विरोध नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मी आपल्याला प्रशासनाकडून खुलासा करतो. आपल्या सर्व जागा ताब्यात आल्यानंतर भविष्यात स्टेडीयम बांधणे हा आपला उद्देश राहिल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण १८० मि. ना.

**प्रशांत पालांडे :-**

७ फुट झाले.

**एस. ए. खान :-**

आपण ह्या वर्षानंतर बांधू या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

६ फुट हे छोटे पडणार नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये ॲक्युपंक्चरचा ट्रॅक २ फुटाचा आहे आणि ४ फुटाचा प्लेन ट्रॅक आहे ओ आपले डिसीजन तयार केलेले आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब घेता तर मोठा घ्या ना.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करत आहे. दुसरा ठराव घ्या.

**शरद पाटील :-**

साहेब, ठराव मंजुर नाही. त्यात पहिली आमची सुचना घ्या. तो ट्रॅक मोठा करा. १० फुटाचा करा. जॉगींग ट्रॅक १० फुटाचा करा. त्यांनी काय सांगितले. चार फुटाचा कसला आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, ह्याची साईज वाढवा.

**शरद पाटील :-**

टोटल १० फुट करा.

**मा. सभापती :-**

आपल्याला गरज वाटली तर आपण पुन्हा घेवू. पहिला पब्लिक किती येते ते बघा.

**शरद पाटील :-**

येईल ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दिडशे फुटवरचा जॉगींग ट्रॅक तो एवढा चालतो आणि भरपुर रश असतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, त्यांची सुचना काय?

**शरद पाटील :-**

आमची सुचना आहे की १० फुटाचा करा.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. तुमची सुचना घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साईज वाढवा.

**मा. सभापती :-**

साईज वाढली म्हणजे पैसे वाढतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**
पैस वाढू द्या.

**मा. सभापती :-**
मंजुरी दिलेली आहे. ठिक आहे. आपण मंजुरी देवू. आता आपण वाढीव कामाला आपण मंजुरी देवू.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**
१० फुटाचा ट्रॅक हा फार मोठा होईल आणि तेवढे मोठे भरुन लोक चालणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**
आम्ही १० फुट सांगितले. आम्ही फक्त एवढे सांगितले आहे की तुम्ही जेव्हा ट्रॅक बनवणार. ते ट्रॅक बनवल्यानंतर तुम्ही ......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**
आपल्याला भविष्यात स्टेडीयम बांधायचे आहे. तर ते वेस्ट होईल.

**मिलन म्हात्रे :-**
क्रिकेटचे पिच पण आहे. त्याची आपण साईडला जागा करुन घेतली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
साहेब, नगररचनाची परवानगी घेतली का? मध्ये शेतकऱ्यांचे लफडे होते. हे होते, तर काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**
वादाच्या ठिकाणी आपण बांधणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**
आता ते तुमच्या ताब्यात आहे ना. त्याच्यावर करता.

**प्रकरण क्र. ०७ :-**
भाईंदर (प.) नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात जॉगिंग ट्रॅक तयार करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ०८ :-**
भाईंदर (प.) येथे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान हे एकमेव मैदान असून सदर मैदानात जॉगिंग ट्रॅक करणे बाबत स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येत आहे. सदर ठिकाणी ४१० मीटर X १.८० मीटर रूंदीचे जॉगींग ट्रॅक तयार केल्यास सकाळच्या वेळेस मॉर्निंग वॉक करिता येणाऱ्या नागरिकांची चांगली सोय होईल. सदर कामी रू. १०,९१,१०५/- एवढा खर्च अपेक्षित असुन स्टेडीयम / क्रिडा संकूल या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चाच्या अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे** **अनुमोदक :- श्री. तुळशीदास म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**
प्रकरण क्र. ८, उत्तन धावगी येथील घनकचरा प्रकल्पाकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**शानु गोहिल :-**
उत्तन धावगी येथे घनकचरा प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून महानगरपालिकेने उत्तन रस्त्यापासुन धावगी पर्यंत मुख्य रस्ता तयार केला आहे. घनकचरा प्रकल्पाकडे जाण्याकरिता धावगी येथून दुहेरी मार्ग तयार करण्यात आला आहे. प्रकल्पाकडे भरलेल्या गाड्या घेउन जाण्याकरिता उतरणीच्या बाजुस व रिकामी ट्रक येण्याकरिता चढ बाजुस रस्ता तयार केला आहे. सदर रस्त्याचे खडीकरण व ग्राउटींग पर्यंतचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर ४८०.०० मीटर १२.५० मीटर रस्त्यावर डांबरीकरणाचे काम पुर्ण करावयाचे असून त्याकरिता रू. २१,५८,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २००८-०९ या वर्षाच्या ''घनकचरा व्यवस्थापन रस्ते बांधकाम'' या लेखाशिर्षाखाली रू. ५०.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकिय खर्चास व निविदा मागविण्यास प्रशासकिय, आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**नयना म्हात्रे :-**
या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ह्याची रुंदी किती आहे? १२.५० म्हणजे १२ X ३ = ३६ म्हणजे ४२ फुट रुंद झाला. तर तेवढा आहे का?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, मला जरा बोलायचे आहे. आपला घनकचरा प्रकल्प चालू झाला का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

नाही चालू झाला.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य शानु गोहिल मॅडम आपने जो ठराव रखा है ना वह रोड उतना रुंद नही बनेला। १२ X ३ = ३६ मतलब ४२, ४५ मि. चौडा हो गया। आप चेक करो।

**दिपक खांबित :-**

तेवढी रुंदी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही मला आता मेजरमेन्टच सांगता का? मी त्या रोडवर दहा वेळा जाउन आलो. तुम्ही डांबरीकरण झालेला रस्ता अजून मोजा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

डांबरीकरण रस्ता झालेला नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, तुम्ही कुठले बोलता अक्झॅक्टली प्लॅनच्या समोरचा फक्त आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही शब्दरचना काय दिले?

**दिपक खांबित :-**

साहेब बघा ना.

**मिलन म्हात्रे :-**

उत्तन रोडपासून सुरु होवून घनकचरा व्यवस्थापनापर्यंत जाणारा रस्ता.

**दिपक खांबित :-**

तयार केला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तयार केला आहे तर तो किती झाला?

**दिपक खांबित :-**

तो दिड किलोमीटर आहे. तो पहिला सुरुवातीचा आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

डांबरीकरणाचा ट्रॅक आहे. तेवढा नाही. असे ते म्हणतात.

**मिलन म्हात्रे :-**

हो. हे लोकेशन जे दिलेले आहे ते तुम्ही काय दिलेले आहे. उत्तन पासून सुरु झाले.

**दिपक खांबित :-**

नाही. असे दिले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे दिले आहे ना. तिकडे कमी आहे का? तो तिकडे जावून आलेलो आहे. साहेब, मेजरमेन्टमध्ये काही चुक झाले का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

४८०, ५०० मिटरच्या .....

**मिलन म्हात्रे :-**

ती नाही. लांबी सांगत नाही. रुंदी सांगतो. साहेब, ४५ मिटर आहे. १२ पॉईंट समथिंग काहीतरी आहे ना.

**दिपक खांबित :-**

साडे बारा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साडे बारा म्हणजे सव्वातीन फुटाचा एक मिटर होतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हे पहा. जे एक्झीक्युशन होईल त्याचेच एम.बी.ला रेकॉर्ड होतो.

**दिपक खांबित :-**

साहेब तसे नाही. मी बोलतो. सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब जे बोलतात ना सुरुवातीचा आपला रस्ता दिड कि.मी. चा आहे. कुठपर्यंत धावगीची जी झोपडपट्टी आहे ना तिथपर्यंत डांबरीकरणाचा रस्ता झालेला आहे. खडीकरण झालेले आहे आणि हा रस्ता जो आहे ना तो प्रकल्पाच्या समोरचा फक्त १५०० फुटाचा रस्ता आहे. १५०० X फुट ४० फुट झालेला आहे. त्याला फक्त डांबराचा एक थर द्यायचा आहे. त्याचे हे काम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला परत सांगतो. १५०० फुट म्हणजे किती कि.मी. झाले ते सांगा.

**दिपक खांबित :-**

४८० मीटर ना साहेब. ४८० मी. X १२.५० मी. म्हणजे सुमारे १५०० फुट. ४० फुटाचा रस्ता एवढाच रस्ता डांबरीकरण करायचा.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही तुमचे मत असे का दिले की, उत्तन रस्ता पासून धारावी पर्यंत हा विषय का दिला?

**दिपक खांबित :-**

उत्तन धावगी येथील घनकचरा प्रकल्पाकडे म्हणजे जस्ट प्रकल्पा समोरचा रस्ता आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुमचे एकच पाहिजे ना की, घनकचरा व्यवस्थापनाचा जो प्रकल्प आहे. तेथून अमुक एवढे मीटर.

**दिपक खांबित :-**

साहेब, त्यांनी दोन ओळी म्हटलेले आहे की, हा रस्ता तयार केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मला तरी घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रकल्पाअंतर्गत रस्ता आहे का?

**दिपक खांबित :-**

नाही. बाहेरचा.

**मिलन म्हात्रे :-**

एक रस्ता भुत बंगल्याच्या बाजुने गेला. तोच रस्ता का?

**दिपक खांबित :-**

हो तोच रस्ता.

**मिलन म्हात्रे :-**

मग त्याचे ४५ फुट भरेल का?

**दिपक खांबित :-**

दिड कि.मी. लांबी संपल्यावरती जो पुढचा भाग आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तो सुरुवातीचा १२ मीटर नाही. ते फॅक्ट आहे. पण पुढे गेल्यानंतर ५०० .......

**दिपक खांबित :-**

हो तोच.

**मा. सभापती :-**

विषय दुसरा घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, घनकचरा प्रकल्प चालु झालेला आहे का?

**मा. सभापती :-**

हो चालु झालेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

तो कधीपासून चालु झालेला आहे?

**मा. सभापती :-**

१५ दिवस झाले. चालु झाला आहे.

**नयना म्हात्रे :-**

मग त्याच्यावर कमिटी वगैरे बनवायची आहे की नाही.

**मा. सभापती :-**

तेच विचारायला लागेल. मला माहित नाही.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

आपण ठेका दिलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

आपण त्याचा ठेका दिलेला आहे बरोबर आहे. पण आपली महापालिकेची कमिटी नको का?

**मा. सभापती :-**

पालिकेचे अधिकारी आहेत ना. मग कमिटीची गरज कशाला?

**नयना म्हात्रे :-**

अधिकारी कशाला? आपण नगरसेवक कशाला आहोत? लोकांनी आपल्याला निवडून दिलेले आहे. अधिकारी काय करतील? काय चुना लावतील काय ठेवतील? हे आपल्याला कसे माहित पडणार?

**प्रकरण क्र. ८**

उत्तन धावगी येथील घनकचरा प्रकल्पाकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ०९:-**

उत्तन धावगी येथे घनकचरा प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून महानगरपालिकेने उत्तन रस्त्यापासुन धावगी पर्यंत मुख्य रस्ता तयार केला आहे. घनकचरा प्रकल्पाकडे जाण्याकरिता धावगी येथून दुहेरी मार्ग तयार करण्यात आला आहे. प्रकल्पाकडे भरलेल्या गाड्या घेउन जाण्याकरिता उतरणीच्या बाजुस व रिकामी ट्रक येण्याकरिता चढ बाजुस रस्ता तयार केला आहे. सदर रस्त्याचे खडीकरण व ग्राउटींग पर्यंतचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर ४८०.०० मीटर १२.५० मीटर रस्त्यावर डांबरीकरणाचे काम पुर्ण करावयाचे असून त्याकरिता रू. २१,५८,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २००८-०९ या वर्षाच्या “घनकचरा व्यवस्थापन रस्ते बांधकाम” या लेखाशिर्षाखाली रू. ५०.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकिय खर्चास व निविदा मागविण्यास प्रशासकिय, आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल          अनुमोदक :- श्रीम. नयना म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०९, भाईंदर (प) स्मशानभूमीत गॅस शववाहिनी बसविणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) भागात एकमेव स्मशानभुमी आहे. सदर स्मशानभुमीत शवदाहिनी बसविण्याबाबत वेळोवेळी मागणी करण्यात येत आहे. भाईंदर (प.) स्मशानभुमीत शवदाहीनी करीता जागा उपलब्ध आहे. लाकडावरील एक शवदहन म्हणजे एका पूर्ण वाढलेल्या वृक्षाचे भरण प्रचंड प्रमाणात वाढणारी लोकसंख्या व तिच्या व्यस्त प्रमाणात कमी होत जाणारी वृक्षसंख्या यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते आणि सर्वत्र प्रदुषण होते. त्याचप्रमाणे पारंपारीक पद्धतीनुसार लाकडे वापरुन केलेल्या शवदहनामुळे सर्वत्र धुर पसरतो व वाऱ्याने राख उडते आणि चितेच्या आजूबाजूला मोठया प्रमाणात उष्णता होते. परीणामी शवदाहीनी अतिशय क्लेशकारक, त्रासदायक व प्रदुषणकारक होतात. या सर्व त्रुटी व अडचणी दुर करुन स्वच्छ, सुलभ व स्वस्त शवदाहने करण्यास मिळावी आणि त्यामुळे पर्यावरणास आवश्यक असे वृक्षसंवर्धन करणे यासाठी डीझेल व गॅसवर चालणाऱ्या शवदाहिनीचा पर्याय उपलब्ध झालेला आहे. तसेच भांडवली खर्च वापरण्याचा दैनंदिन खर्च, निगा दुरूस्तीचा खर्च कालावधी व प्रदुषण या सर्व बाबतीत डीझेल व गॅस शवदाहीनी तांत्रिक दृष्टया विद्युत दाहिनीपेक्षा सरस आहे. या शवदाहिनीमध्ये सरासरी १६ किलो एल.पी.जी. गॅस आवश्यक असून त्याकरीता ६० मिनीटे कालावधी लागतो व डीझेल शवदाहीनीमध्ये २४ लिटर डीझेल आवश्यक असून त्याकरीता ६० मिनीटेच कालावधी लागतो. सदर कामी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पामध्ये रु. ५०.०० लाख एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. गॅस शवदाहीनी करीता ४५.६० लक्ष एवढा खर्च येणार असून प्रेत जाळण्याकरीता रू ७५०/- एवढा खर्च येणार आहे. तुलनात्मक दृष्टया व देखभाल दुरूस्ती पाहता गॅस शवदाहीनी बसविणे योग्य वाटते. सदर खर्चास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**एस. ए. खान :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

६० मिनिट लागतील, ह्याचा अर्थ काय? २४ लीटर डिझेल आवश्क असून त्याकरिता ६० मिनिट कालावधी लागेल आणि एल.पी.जी. गॅस ६० मिनिट म्हणजे काय?

**प्रशांत पालांडे :-**

अंतिम संस्कार व्हायला ६० मिनिट लागतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

१ तास. हा प्रकार काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये आणखीन एक माहिती द्यायला पाहिजे होती. ती बांधकाम विभागाने अजून माहिती दिलेली नाही. साहेब, त्याच्यात त्यांचे ब्राउश्चरचे आले आहे. के.डी.एम.सी. मध्ये ह्या संस्था आता कार्यरत आहेत. एका बॉडीची फक्त दिड किलो ॲश तयार होते. त्यानंतर वरती जी ॲश निघते. म्हणजे धुर त्यांच्या पाण्याचा बॉयलर सिस्टीम आहे. त्याच्यातून संपूर्णपणे फर्टिलर होवून संपूर्ण बाहेर निघते. फिल्टर होवून. म्हणजे डेडबॉडीजमध्ये जे रोग आहे त्याचे राखेवाटे बाहेर किंवा धुरावाटे जे प्रदुषण असते ते होत नाही.

**शरद पाटील :-**

इलेक्ट्रीकमध्ये किती वेळ लागेल?

**मिलन म्हात्रे :-**

इलेक्ट्रीकला एक, दिड तास तरी लागतो.

**शरद पाटील :-**

गॅस आणि ह्यांचे झाले. इलेक्ट्रीकला किती वेळ लागतो.

**नगरसचिव :-**

लाकडला किती वेळ लागतो?

**मिलन म्हात्रे :-**

लाकडाला २४ तास लागतो.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये ५० लाख रु. ची तरतुद आहे. आणि ह्याच्यात साडे ४६ लाख खर्च केले.

**शरद पाटील :-**

इलेक्ट्रीकला १० मिनिटे लागतात.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब ते कसे असते की, इलेक्ट्रीकच्या वाहीनीचे असे आहे की, ती २४ तास आपल्याला चालू ठेवावी लागते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

इलेक्ट्रीक लावायचे असेल तर कंन्टन्यु बॉडी पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

खतगावकर साहेब, साडे सेहचाळीस लाख रु. येथे खर्च केले. तर ५० लाखाची तरतुद आहे. तर मिरारोडला ह्यावेळी लागली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रायोगिक तत्वावर आपण हे ठरवले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण ह्याच्यावर पहिले हे करायचे .......

**प्रशांत पालांडे :-**

मी दुसरे विचारत होतो. आता आपण ७५० रु. सगळ्या नागरीकांकडून घेणार. आता सगळ्या स्मशानुभुमी लांकडांच्या किंमती वेगवेगळ्या का? त्याच्यावर आपला कंट्रोल नसतो का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, ही गोष्ट खरी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर पश्चिमेला काय आहे? आमच्याकडे राममंदीर रोडवरील ......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

लाकूड हे आपल्याला संस्था देते ना.

**प्रशांत पालांडे :-**

रेटवर आपला कंट्रोल पाहिजे ना. ते काहीही घेतात.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर वेस्टला राम मंदिरची जी संस्था आहे. तेथे अनेक व्यापारी, नागरीक जुनेजाणते आहेत. नो लॉस नो प्रॉफीट तत्वावरती त्यांची सुरुवात साहेब, सव्वाशे, दिडशे, तिनशे असे भाव वाढत गेले. आज माझ्या माहितीनुसार ८००, ८५०, १००० रु. काहीतरी त्यांचा रेट आहे. प्लस एखादी बेवारशी बॉडी आली. त्याला ते

फुकट देतात. आपल्या सारख्या नगरसेवकांनी विनंती केली तर अर्धी किंमत असते. म्हणजे ते जे लॉस वगैरे होतात. ते झेलून १००० रु. च्या वरती कॉस्ट नाही आणि ही आमच्या इकडची गोष्ट आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, काशिमिरामध्ये फार मोठा प्रॉब्लम चाललेला आहे. लाकुड विकणारा जो व्यक्ती आहे ना तो पाहिजे तसा रेट घेतो.

**प्रशांत पालांडे :-**

तो कोण आहे तो बघाना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्याच्यावर ब-याच लोकांच्या तक्रारी पण आलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझी इच्छा अशी आहे की, दहिसरला आपल्या बी.एम.सी. ची जी स्मशानभुमी आहे तर तिकडे ते लोक काटा लावून किलोवर लाकड देतात. तिथला रेट काय आहे ते कम्पेअर करा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, थोडा कंन्ट्रोल पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण दहिसरचे रेट काढून आणा. दौलत नगरला आहे. तिकडे काट्यावर देतात. किती पाहिजे तर ते वजन करुन देतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब आपल्याकडे नियम आहे का की, स्मशानभुमीमध्ये लाकुड विक्री करायचे का?

**मिलन म्हात्रे :-**

बॉम्बेला काय आहे माहित आहे का? स्मशानभुमीत त्यांनी लाकडाच्या रेटचे बोर्ड लावलेले आहे. हा ठेकेदार कोण? ह्याला ठेका कधीपर्यंत दिलेला आहे? ह्यांनी किती किलो रुपये विकायचे?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आपल डिपार्टमेन्ट कोणाकडे आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कार्यकारी अभियंताकडे आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, स्मशानभुमीचे डिपार्टमेन्ट तुमच्याकडे आहे. लाकडे देणे. स्मशानभुमी की लाकडे? साहेब, काशिमिराचे बरेच प्रॉब्लम ऐकायला येतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खतगावकर साहेब, माझी एक सुचना आहे की, संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये जेवढे स्मशानभुमी आहे ना त्या स्मशानभुमीला जी लाकडे लागतात ती लाकडे कोण सप्लाय करते. कुठली संस्था सप्लाय करते आणि त्यामुळे नागरीकांना त्रास होतो की नाही? ह्याचा सगळा अभ्यास करुन एकच रेट द्या आणि हे सगळ पुढच्या मिटींगमध्ये ठेवा.

**दिपक खांबित :-**

साहेब, आम्ही आमच्याकडे पहिली एक बैठक घेतो. आणि मग गोषवारा घेवून आम्ही आणतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, बंधन घातले पाहिजे. म्हणून मी म्हटले की, दहिसरचे रेट काढा. बी.एम.सी. त्याला ठेका देते. दहिसरला दौलत नगरला ब्रिजच्या खाली स्मशानभुमी आहे. साहेब, तिकडे ही पध्दत आहे की, तिकडे बी.एम.सी. चा बोर्ड लावलेला आहे. त्याच्यावर प्रती एक शव एवढे रुपये ......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही सर्वांनी ज्या सुचना दिलेल्या आहेत. त्यात इतंभूत प्रशासनाकडून इन कार्पोरेट कडून बाहेरची माहिती घेवून त्याचा एक चांगला विषय घेवून पुढच्या मिटींगला आणला लाईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठिक आहे. आणा.

**मिलन म्हात्रे :-**

जरा लवकर करा. कारण भरपुर परिस्थिती खराब आहे. आणि त्याही पेक्षा ज्या संस्थांना आपण काम दिलेले आहे. कधी कधी ते लोक लाकडे उपलब्ध नसतील तर ते सरळ सांगतात की, आमच्याकडे उपलब्ध नाही. तुम्ही बाहेरुन लाकडे घ्या.

**शरद पाटील :-**

साहेब जी भाईंदर इस्टला बंदरवाडी स्मशानभुमी आहे. तिथे ॲक्झॉस्ट फॅन लावलेला आहे. उलटा तो ॲक्झॉस्ट फॅन लावल्यामुळे धुर सगळा पसरला जातो. तिथे आजुबाजुला बिल्डींग आहेत आणि तो लावलेला

आहे तो ॲक्झॉस्ट फॅन बरोबर लावलेला नाही तर त्याची जरा पाहणी करुन त्याचा योग्य उपयोग जर होत असेल तर करा. नाहीतर तो ॲक्झॉस्ट फॅन काढून टाका. तो सर्व धूर सरळ जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

दोन फॅन लावण्याचे टेंडर आहे. आणि एक फॅन लावलेला आहे. दोन फॅनचे टेंडर होते आणि व्यास पण कमी आहे.

**प्रशांत पालांडे :-**

नवघरमध्ये काही सुधारले की नाही? साहेब मध्ये आम्ही गेलो होतो तर मोबाईलच्या लाईटवर आम्ही सगळ चेक केले होते.

**प्रकरण क्र. ०९ :-**

भाईंदर (प) स्मशानभूमीत गॅस शववाहिनी बसविणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १०:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) भागात एकमेव स्मशानभुमी आहे. सदर स्मशानभुमीत शवदाहिनी बसविण्याबाबत वेळोवेळी मागणी करण्यात येत आहे. भाईंदर (प.) स्मशानभुमीत शवदाहीनी करीता जागा उपलब्ध आहे. लाकडावरील एक शवदहन म्हणजे एका पूर्ण वाढलेल्या वृक्षाचे भरण प्रचंड प्रमाणात वाढणारी लोकसंख्या व तिच्या व्यस्त प्रमाणात कमी होत जाणारी वृक्षसंख्या यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते आणि सर्वत्र प्रदुषण होते. त्याचप्रमाणे पारंपारीक पद्धतीनुसार लाकडे वापरुन केलेल्या शवदहनामुळे सर्वत्र धुर पसरतो व वाऱ्याने राख उडते आणि चितेच्या आजूबाजूला मोठया प्रमाणात उष्णता होते. परीणामी शवदाहीनी अतिशय क्लेशकारक, त्रासदायक व प्रदुषणकारक होतात. या सर्व त्रुटी व अडचणी दुर करुन स्वच्छ, सुलभ व स्वस्त शवदाहने करण्यास मिळावी आणि त्यामुळे पर्यावरणास आवश्यक असे वृक्षसंवर्धन करणे यासाठी डीझेल व गॅसवर चालणाऱ्या शवदाहिनीचा पर्याय उपलब्ध झालेला आहे. तसेच भांडवली खर्च वापरण्याचा दैनंदिन खर्च, निगा दुरूस्तीचा खर्च कालावधी व प्रदुषण या सर्व बाबतीत डीझेल व गॅस शवदाहीनी तांत्रिक दृष्टया विद्युत दाहिनीपेक्षा सरस आहे. या शवदाहिनीमध्ये सरासरी १६ किलो एल.पी.जी. गॅस आवश्यक असून त्याकरीता ६० मिनीटे कालावधी लागतो व डीझेल शवदाहीनीमध्ये २४ लिटर डीझेल आवश्यक असून त्याकरीता ६० मिनीटेच कालावधी लागतो. सदर कामी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पामध्ये रु. ५०.०० लाख एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. गॅस शवदाहीनी करीता ४५.६० लक्ष एवढा खर्च येणार असून प्रेत जाळण्याकरीता रू ७५०/- एवढा खर्च येणार आहे. तुलनात्मक दृष्टया व देखभाल दुरूस्ती पाहता गॅस शवदाहीनी बसविणे योग्य वाटते. सदर खर्चास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे          अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमध्ये तळ मजल्यावर गटनेत्यांना दालने उपलब्ध करुन देण्याबाबत खर्चास मान्यता देणे.

**एस. ए. खान :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीच्या तळ मजल्यावर गटनेत्यांकरीता पाच दालने उपलब्ध आहेत. मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचे कडील दि. २७/०९/२००७ च्या पत्रात एकूण १० गटनेते असल्याबाबतचा उल्लेख आहे. दि. १०/०४/२००८ रोजीच्या मा. महासभेत सर्व १० गटनेत्यांना दालने उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. तळ मजल्यावर १० गटनेत्यांना दालने उपलब्ध करून दयावयाची असल्यास सध्या बंद असलेली कॅटीन तोडून सदर जागा वापरावी लागणार आहे. तसेच पक्षाच्या सदस्य संख्येप्रमाणे दालने उपलब्ध करून दयावयाची आहेत. सदर कामी एकूण रू. ४,६७,८५१ /- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी कॅटीन तोडून १० गटनेत्यांची दालने उपलब्ध करून देण्यास व सदर कामी येणाऱ्या खर्चास व निविदा मागवून काम करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**शानु गोहिल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

खांबित साहेब, मग कॅन्टीन आपली कायमची बंद आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

अशी पण कॅन्टीग बंद पडलेली आहे.

**शरद पाटील :-**

सचिवांनी ठराव वाचून कायम करु दे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, कॅन्टीनचे काय?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कॅन्टीन अशी पण बंद पडलेली आहे. तर त्याच्यापेक्षा गटनेत्यांना केबिन भेटतील.

**प्रशांत पालांडे :-**

आपल्याकडे कॅन्टीनला दुसरी कुठे जागा नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १० करिता ठराव आलेला आहे. त्याचे मी वाचन करतो. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीच्या तळ मजल्यावर गटनेत्यांकरीता पाच दालने उपलब्ध आहेत. मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचे कडील दि. २७/०९/२००७ च्या पत्रात एकूण १० गटनेते असल्याबाबतचा उल्लेख आहे. दि. १०/०४/२००८ रोजीच्या मा. महासभेत सर्व १० गटनेत्यांना दालने उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. तळ मजल्यावर १० गटनेत्यांना दालने उपलब्ध करून दयावयाची असल्यास सध्या बंद असलेली कॅटीन तोडून सदर जागा वापरावी लागणार आहे. तसेच पक्षाच्या सदस्य संख्येप्रमाणे दालने उपलब्ध करून दयावयाची आहेत. सदर कामी एकूण रू. ४,६७,८५१ /- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी कॅटीन तोडून १० गटनेत्यांची दालने उपलब्ध करून देण्यास व सदर कामी येणा-या खर्चास व निविदा मागवून काम करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात आमची सूचना अशी आहे की, तुम्ही नंतर जी काही गटनेत्यांची रचना कराल. कोणत ऑफीस कुठे परत त्या दालनाला क्रमांक टाका आणि त्या दालनाच्या क्रमांकानुसार दर्शनी भागात एक लिस्ट तयार करा की, आतमध्ये कोणकोण गटनेते बसतात आणि त्याचे पक्ष नाव वगैरे सगळे लिस्ट बाहेर लावा. म्हणजे कळेल. जसे पत्रकार कक्ष दिलेले आहे.

**एस. ए. खान :-**

मॅप दिलेले आहे, त्याप्रमाणे.

**मा. सभापती :-**

आठ दिवसात.

**दिपक खांबित :-**

आठ दिवसांत नाही कारण टेंडर काढायला ८ दिवस लागतील.

**प्रकरण क्र. १० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमध्ये तळ मजल्यावर गटनेत्यांना दालने उपलब्ध करुन देण्याबाबत खर्चास मान्यता देणे.

**ठराव क्र. ११ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीच्या तळ मजल्यावर गटनेत्यांकरीता पाच दालने उपलब्ध आहेत. मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचे कडील दि. २७/०९/२००७ च्या पत्रात एकूण १० गटनेते असल्याबाबतचा उल्लेख आहे. दि. १०/०४/२००८ रोजीच्या मा. महासभेत सर्व १० गटनेत्यांना दालने उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. तळ मजल्यावर १० गटनेत्यांना दालने उपलब्ध करून दयावयाची असल्यास सध्या बंद असलेली कॅटीन तोडून सदर जागा वापरावी लागणार आहे. तसेच पक्षाच्या सदस्य संख्येप्रमाणे दालने उपलब्ध करून दयावयाची आहेत. सदर कामी एकूण रू. ४,६७,८५१ /- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी कॅटीन तोडून १० गटनेत्यांची दालने उपलब्ध करून देण्यास व सदर कामी येणा-या खर्चास व निविदा मागवून काम करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान          अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, मे. आर्चिझम (मे. गिरीष प्रधान) तांत्रिक सल्लागार यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील १) विविध विकास कामाअंतर्गत विशिष्ट स्वरूपाच्या इमारती व इतर कामाचे नकाशे, अंदाजपत्रके, स्ट्रक्चरल डीझाईन तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे स्ट्रक्चरल डिझाईनना शासनमान्य खात्याकडून मान्यता घेणे, प्रत्यक्ष जागेवर लाईन आउुट देउुन कामांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, कामांची मोजमापे घेणे इ. कामांकरीता मा. स्थायी समिती सभा दि. १८/०५/२००५ ठराव क्र. ०९ अन्वये व दि. २०/०६/२००५ च्या आदेशान्वये मे. आर्चिझम यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या कामाची मुदत दि. ०७/०५/२००८ रोजी संपलेली आहे. तथापी त्यांच्याकडील खालील कामाबाबत प्रत्यक्षात कार्यवाही सुरू आहेत.

१) भाईदर (प) हॉस्पीटल इमारत बांधणे.
२) भाईंदर (प) शवागृह बांधणे.
३) मिरारोड येथिल आरक्षण क्र. १९२ व १९३ मध्ये O.P.D, Blood Bank व शवागृह, वाचनालय इमारत बांधणे.

२) तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील डी.पी. रोड आरक्षणे, रस्ते यांचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार सर्व्हे करणे तसेच रस्ते व इतर आरक्षणाचा सर्व्हे करून आर.सी.सी. पोल बसविणेचे काम मे. नियश यांना देण्यात आले होते. सदर कामाची मुदत हि दि. ०७/०५/२००८ रोजी संपत आहे.

वरीलपैकी मे. आर्चिझम यांच्याकडील सुरू असलेली कामे पाहता मे. आर्चिझम यांना तीन कामांकरीता सदर कामे पूर्ण होईपर्यत मंजूर दरानेच मुदतवाढ देण्यात येत आहे. महानगरपालिकेस करावयाच्या इतर कामी तांत्रिक सल्लागाराची आवश्यकता वाटल्यास वेळोवेळी स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्यात.

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव वाचून कायम करण्यात यावा.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून कायम करण्यात यावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मुदतवाढ किती दिवसाची दिले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काम संपेपर्यंत.

**नगरसचिव :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील १) विविध विकास कामाअंतर्गत विशिष्ट स्वरूपाच्या इमारती व इतर कामाचे नकाशे, अंदाजपत्रके, स्ट्रक्चरल डीझाईन तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे स्ट्रक्चरल डिझाईनना शासनमान्य खात्याकडून मान्यता घेणे, प्रत्यक्ष जागेवर लाईन आउुट देउुन कामांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, कामांची मोजमापे घेणे इ. कामांकरीता मा. स्थायी समिती सभा दि. १८/०५/२००५ ठराव क्र. ०९ अन्वये व दि. २०/०६/२००५ च्या आदेशान्वये मे. आर्चिझम यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या कामाची मुदत दि. ०७/०५/२००८ रोजी संपलेली आहे. तथापी त्यांच्याकडील खालील कामाबाबत प्रत्यक्षात कार्यवाही सुरू आहेत.

४) भाईदर (प) हॉस्पीटल इमारत बांधणे.
५) भाईंदर (प) शवागृह बांधणे.
६) मिरारोड येथिल आरक्षण क्र. १९२ व १९३ मध्ये O.P.D, Blood Bank व शवागृह, वाचनालय इमारत बांधणे.

२) तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील डी.पी. रोड आरक्षणे, रस्ते यांचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार सर्व्हे करणे तसेच रस्ते व इतर आरक्षणाचा सर्व्हे करून आर.सी.सी. पोल बसविणेचे काम मे. नियश यांना देण्यात आले होते. सदर कामाची मुदत हि दि. ०७/०५/२००८ रोजी संपत आहे.

वरीलपैकी मे. आर्चिझम यांच्याकडील सुरू असलेली कामे पाहता मे. आर्चिझम यांना तीन कामांकरीता सदर कामे पूर्ण होईपर्यत मंजूर दरानेच मुदतवाढ देण्यात येत आहे. महानगरपालिकेस करावयाच्या इतर कामी तांत्रिक सल्लागाराची आवश्यकता वाटल्यास वेळोवेळी स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्यात.

**प्रकरण क्र. ११ :-**

मे. आर्चिझम (मे. गिरीष प्रधान) तांत्रिक सल्लागार यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. १२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील १) विविध विकास कामाअंतर्गत विशिष्ट स्वरूपाच्या इमारती व इतर कामाचे नकाशे, अंदाजपत्रके, स्ट्रक्चरल डीझाईन तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे स्ट्रक्चरल डिझाईनना शासनमान्य खात्याकडून मान्यता घेणे, प्रत्यक्ष जागेवर लाईन आउुट देउुन कामांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, कामांची मोजमापे घेणे इ. कामांकरीता मा. स्थायी समिती सभा दि. १८/०५/२००५ ठराव क्र. ०९ अन्वये व दि. २०/०६/२००५ च्या आदेशान्वये मे. आर्चिझम यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या कामाची मुदत दि. ०७/०५/२००८ रोजी संपलेली आहे. तथापी त्यांच्याकडील खालील कामाबाबत प्रत्यक्षात कार्यवाही सुरू आहेत.

७) भाईदर (प) हॉस्पीटल इमारत बांधणे.
८) भाईंदर (प) शवागृह बांधणे.
९) मिरारोड येथिल आरक्षण क्र. १९२ व १९३ मध्ये O.P.D, Blood Bank व शवागृह, वाचनालय इमारत बांधणे.

२) तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील डी.पी. रोड आरक्षणे, रस्ते यांचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार सर्व्हे करणे तसेच रस्ते व इतर आरक्षणाचा सर्व्हे करून आर.सी.सी. पोल बसविणेचे काम मे. नियश यांना देण्यात आले होते. सदर कामाची मुदत हि दि. ०७/०५/२००८ रोजी संपत आहे.

वरीलपैकी मे. आर्चिझम यांच्याकडील सुरू असलेली कामे पाहता मे. आर्चिझम यांना तीन कामांकरीता सदर कामे पूर्ण होईपर्यत मंजूर दरानेच मुदतवाढ देण्यात येत आहे. महानगरपालिकेस करावयाच्या इतर कामी तांत्रिक सल्लागाराची आवश्यकता वाटल्यास वेळोवेळी स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्यात.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे**　　　　**अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरा पार्क ते वैभव अपार्टमेन्ट ते कानुंगो ते मेडतीया नगर पर्यंत खोदलेला नाल्यास पिचींग करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब ह्याची जे रस्त्याची साईड आणि नाल्याची साईड दिलेली आहे. त्याठिकाणी आमची शेती तिथे पूर्वी होती. तर नगररचना विभागाने काही प्लान पास केले. हा जवळ जवळ माझ्या माहितीनुसार साहेब १०० फुट रुंद एवढा नाला असेल. त्याच्याही पेक्षा जास्त असेल. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब आहेत त्यांना माहित आहे. त्या नाल्यातले पाणी आम्ही पूर्वी शेतीला घ्यायचे म्हणजे ऑस्ट्रील कंपनीच्या कंम्पाउंड ला लागून जवळ जवळ १५०, १२५ चा तो लांब, बारिक होत तो नाला गेलेला आहे. तर पूर्वी तो नैसर्गिक नाल्याचा म्हणजे पाण्याचा स्त्रोत होता. आज ती जागा शासकीय आहे. त्या बिल्डर ने हा नाला बुझवला. उतारे कसे नावावर झाले. तो भाग वेगळा झाला पण त्याठिकाणी आपल्या विभागातले नगररचना विभागाने प्लॅन कसे पास केले. आज एकीकडे नाल्याचे सर्व्हे करतात. नाले डिबार्केट करुन जे. डी.पी प्लान मध्ये सोयिस्कर रित्या दाखवले गेले नाही. एकीकडे नाल्याचे डिझाईन करण्याकरिता तुम्ही एका ॲजेन्सीला काम दिले. अहो हा अख्खा नालाच आहे. साहेब त्याच्यामध्ये बिल्डिंगचे प्लॅन पास झाले आहेत. आणि आज त्या नाल्याच्या बाजूला फ्लॉवर पॉटपासून ह्या भिंतीपर्यंत गटार आहे. गटार बांधण्याकरिता मंजूरीचा विषय आलेला आहे. पण विकासकांनी जो भराव केलेला आहे. तो पूर्ण नाला त्यांनी बुजवलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आता चालू नाही झाले ना.

**मिलन म्हात्रे :-**

नकाशे मंजूर झाले आहेत. म्हणजे मला सांगा. नाल्यातल्या जागेत. त्यांनी संपूर्ण भराव केला त्याच्यानंतर त्यांनी सरकारी जागेवर प्लॅन पास करुन घेतले आणि आपण आता त्याची सांय करण्याकरिता आणखीन साईडला गटार काढून देणार आहोत. साहेब, त्या जागेत हे प्लॅन बसू पण शकत नाही. हे ही तुम्हाला सांगतो.

**शरद पाटील :-**

साहेब, आपला जो नाला आहे. म्हणजे सरकारी नाला आहे..........

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पाणी निचरा करणे तर आवश्यक आहे ना.

**शरद पाटील :-**

निचरा करणे आवश्यक आहे. म्हणजे आपली सरकारी जागा आहे. आपला पहिला नाला आहे. तो त्यांना द्यायचा का?

**मिलन म्हात्रे :-**

नाल्याचा सर्व्हेअर कोण आहे? त्याला बोलवा. त्यांना विचारा त्यांनी रिमार्केशन काय केले? गावनकाशे होते. त्या गावनकाशामध्ये ......

**एस. ए. खान :-**

पहिला बिल्डींग नव्हती म्हणून तिथे ओपन प्लॉट होते. त्याच्यामध्ये आजुबाजूला बिल्डींग झालेल्या नव्हत्या. त्याच्यामध्ये निचरा सोडलेला होता. आता बिल्डींगने भराव केलेला आहे. आम नागरीकांना काय माहित की, कोणाची जागा आहे? काय आहे? नैसर्गिक नाला होता बरोबर आहे. तिकडून पाणी येत होते, तिकडून पाणी जात होते. म्हणून काही प्रॉब्लम नव्हता. पण आता भराव केल्यामुळे ते पाणी सगळं सोसायटीच्या कंपाउंडमध्ये थांबायला लागले. म्हणजे चॉकअप झाले. त्यामुळे कमिशनर साहेबांना कमीतकमी चार-पाच महिन्यापसून वारंवार तक्रार करुन कच्चा नाला खोदलेला आहे. तुमचे म्हणणे बरोबर आहे. आम्ही पत्र पण दिलेले. साहेब, आम्ही ए.टी.पी. ला पत्र दिलेले की, जे नाले आहेत त्याला व्यवस्थित करुन प्लान पास करा.

**मिलन म्हात्रे :-**

प्लान पास करा हे आपण कसे बोलू शकतो? ह्या रुमपेक्षा सुध्दा लांब जागा आहे. आम्ही बिल्डींग बांधली तर त्याला नगररचनेचे सगळे नियम लागतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, आपले नाले अजून बांधलेलेच नाही. ही परिस्थिती पूर्ण मिरा भाईंदरची आहे. ही नैसर्गिक नाल्याबाबतची जी बाब आहे. आता आम्ही काम करतो. ह्या प्लॉट संबंधीत आहे ते आम्ही बघितले नाही. तर इतर शहरामध्ये ही परिस्थिती आहे. पण त्याही ह्याच्यामध्ये त्या विकासकाचा नुकसान होता.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही विकासकाचा नुकसान काय करता तुम्ही प्लॅन कॅन्सल करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जो पर्यंत डेव्हलपमेन्ट प्लानला नाले आयडेन्टीफाय होत नाही. तो पर्यंत नगररचना कधीही निर्णय घेवू शकणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ती सरकारी जागा आहे. तुम्हांला माहित आहे का? त्याचा एन.ए. कसा झाला? त्याला पिकपाणी कसे लागले? कंम्बरभर पाण्यामध्ये पिकपाणी लागते आणि आर.एन.ए. बिल्डरचे नाव लागते. आपण काय बोलता. आहो आम्ही इकडचे शेतकरी आहोत. आमच्या जागा तुम्ही कुठलीही परवानगी न घेता रिकर सेक्शनमध्ये जमिनी टाकता ५०० मीटरपेक्षा जास्त जागा आम्हांला मिलत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा जो विषय आहे ना. तिथे प्रशासनाने कच्चा नाला काढलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय आलेला आहे. आमचे म्हणणे आहे. कच्चा नाला काढू नका. हे आम्ही बोलत नाही. तो कच्चा नाल काढा. पण शासकीय जागेवर नगररचनेने प्लान पास कसे केले? त्या प्लानवर आमचे ऑब्जेक्शन आहे.

**एस. ए. खान :-**

ते प्लान कसे पास केले ते बघायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याची तुम्ही ओपन प्लेस कुठे सोडली? तुम्ही त्याला राईट अप ॲक्सेसरी काय दिला? अशा उभ्या बारीक बारीक नाल्यामध्ये बिल्डींग बनवल्या. त्या सगळ्या सरकारी जागा आहेत. साहेब, त्या जागेमध्ये पहिला नाला होता. आर.एन.ए. ने मातीचा भराव करण्या अगोदर तिथे संपूर्ण नाला होता. त्या कानुंगोच्या इकडून येवून आझाद नगरच्या उघाडीच्या खालून पाणी पास व्हायचे. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब आहेत ना त्यांना बरोबर माहित आहे आणि त्याच्या ही अगोदरचे सांगतो. जिथपर्यंत काशिमिरा रोड नव्हाता, रेल्वे नव्हती. त्यावेळेला आमचा एम.टी.एन.एल. चे वेस्टला जे ऑफीस आहे, तिकडून नाला निघून बोटीने लोक काशिमिरा येथून शेतीला जायची. त्यावेळेला रस्ता नव्हता. तेव्हाची गोष्ट सांगातो. आमचे काका वगैरे हे ९०-९० वर्षाची लोक आहेत. त्यांना हा सगळा इतिहास माहित आहे आणि नाले तर आम्ही बघितले. साहेब, आम्ही त्याच्यावर शेती केली.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शासकीय जमिन नावावर करुन घेतले असे सांगा ना.

**मिलन म्हात्रे :-**

नाला अक्षरशः भरपुर खोल पाण्यामध्ये पिक पाणी लावले कसे त्याचा कन्सेप्ट काय आहे? तलाठ्यानी पिकपाणी हे फक्त जून महिन्यामध्ये लागते. पिक पाण्याचा अर्ज रितसर केला जातो. तुमचे तलाठी शेतकरीकडे येतात. तलाठ्यांचा पंचनामा होतो. त्याच्यामध्ये कोणी पिक लावले, त्या जमिन मालकाने त्याला अधिकार दिले की नाही म्हणजे जरी सरकारी जागा असती ......

**मा. सभापती :-**

नुसते स्टॅम्प द्यायला एवढा वेळ कशाला घालवायचा/ तलाठीने कसे केले? त्यांनी कसे केले? ते जावू दे. आपल्याला जे प्लॅन पाहिजे ते प्लॅन मागवून घ्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

जी गोष्ट आहे सरकारी जागा आहे. त्याच्यामध्ये बिल्डींग अस्तित्वात आहे. आम्ही जे बोलतो ते तुम्ही रेकॉर्डवर घ्या. तुमच्याकडून आम्हाला कुठलेही रुलिंग नको.

**मा. सभापती :-**

मी ह्याच्यावर रुलिंग देवू शकत नाही. हा विषय .....

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय जर विषयपत्रिकेवर आणला नसता तर आम्ही बोललो नसतो. साहेब, ती जागा सरकारी आहे. त्याच्यामध्ये मातीचा भराव झाला.

**मा. सभापती :-**

त्याला माहित आहे का की, सरकारी जमिन आहे की नाही. तुम्ही प्लॅनची कॉपी मागवून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मी तुम्हांला सांगतो ना जर १०० फुटाचा नाला नैसर्गिक असेल तर तुम्ही ३ फुटाची मंजुरी का घेता? ६ मीटरची का घेता? १०० फुटाची घ्या. हे आम्हाला बोलायचे आहे म्हणजे तुम्ही एकीकडे त्या बाकीचे राहिलेले आहे. त्याला मान्यता दिली ना. एकतर नगररचनाने तिकडे प्लॅन पास केले. तर नाले गेले कुठे? मुंबईला मोठमोठ्या कोर्टाचे निर्णय लागतात की, सगळे नाले मोकळे करा म्हणून.

**एस. ए. खान :-**

मग ते कराव करायला द्यायला पाहिजे ना.

**मिलन म्हात्रे :-**

मग, आज तो तुमचा धर्मकार आहे. धर्मकाऱ्या इकडून कानुंगोपर्यंत भराव केलेला आहे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, आम नागरीक कसे थांबणार? जो कोणी मातीचा भराव करतो त्याला आम नागरीक कसे काय थांबवणार?

**मा. सभापती :-**

नगररचना के पास सब प्लान पास हो गया होगा ना।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, नगररचना प्लान पास कसे काय करते? मला ते सांगा?

**मा. सभापती :-**

ते प्लान मागवून घ्या. मग मला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून सांगतो की, सब्जेक्ट टू कन्डीशन तुम्ही ह्याला मंजुरी द्या. आमची सुचना अशी आहे.

**एस. ए. खान :-**

चालेल ना. म्हणजे क्लिअर राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

जर सरकारी जागा असेल, १०० फुटाचा नाला असेल गावनकाशा मागवून घ्या. त्याच्यामध्ये क्लिअर नावे दिलेली आहेत. आम्ही तिकडचे शेतकरी आहोत.

**मा. सभापती :-**

आपल्या सर्व्हेअरला डिमॉर्गेशन करुन द्या. तर नाला राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

आणि ते जर असेल तर १०० फुटाचा नाला बनेल आणि त्या अटीशर्तीला आम्ही अधिन राहून मंजुरी देतो. नाहीतर ह्याला माझ्या एकट्याचा विरोध नोंदवून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, कच्चा नाला खोदण्यात आला आहे तो कुठून कुठंपर्यंत आहे?

**एस. ए. खान :-**

मिरा पार्क ते वैभव अपार्टमेन्ट पर्यंत आणि वैभव अपार्टमेन्टच्या बाजूला लागून कानुंगो ते मेडतीया नगर. पण ते आझाद नगर सांगतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इसमे किधर दिया है? कच्चे नाले का इसमे किधर दिया है?

**एस. ए. खान :-**

वही दिया है ना। कच्चा नाला खोदा है। मिरा पार्कसे वैभव अपार्टमेन्ट और कानुंगो से लेकर मेडतीया नगर।

**एस. ए. खान :-**

मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरापार्क, वैभव अपा, कानंगो इस्टेट इमारतींचा सांडपाणचा निचरा सर्व्हे क्र. ३५० मधील कच्च्या नाल्यातून होत होता. सदर ठिकाणी विकासकाने भरणी केल्याने सदर ठिकाणातील पाण्याचा निचरा होण्याचा प्रश्न निर्माण झाला होत म्हणून सदर ठिकाणी नगररचना विभाग, बांधकाम विभाग व आरोग्य विभागामार्फत संयुक्त पाहणी करुन कच्चा नाला खोदण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी सोनाली हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर तसेच वैभव को.ऑ.सो. कडे जाणाऱ्या रस्त्यावर उघाडी बांधणे आवश्यक आहे. सदर नाल्यास दगडाने पिचिंग करणे तसेच नाल्याच्या रेषेत उघाडी बांधणे कामी रु. १६,५८,४००/- इतके अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत. सदर कामे तातडीने करणे आवश्यक आहे.

सदर कामी सन २००८-०९ वर्षाच्या ''नविन गटारे/नाले बांधकाम'' या लेखाशिर्षाखाली रु. ४,००,००,०००/- एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता व निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**शानु गोहिल :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सुचना आली आहे. तर ती सुचना होवून ठराव मंजुर करण्यात आला आहे आणि सचिवांनी दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १२ :-**

मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरापार्क ते वैभव अपार्टमेन्ट ते कानुंगो ते मेडतिया नगर पर्यंत खोदलेला नाल्यास पिचिंग करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १३ :-**

मिरारोड वॉर्ड क्र. ५२ मधील मिरापार्क, वैभव अपा, कानंगो इस्टेट इमारतींचा सांडपाणचा निचरा सर्व्हे क्र. ३५० मधील कच्च्या नाल्यातून होत होता. सदर ठिकाणी विकासकाने भरणी केल्याने सदर ठिकाणातील पाण्याचा निचरा होण्याचा प्रश्न निर्माण झाला होत म्हणून सदर ठिकाणी नगररचना विभाग, बांधकाम विभाग व आरोग्य विभागामार्फत संयुक्त पाहणी करुन कच्चा नाला खोदण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी सोनाली हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर तसेच वैभव को.ऑ.सो. कडे जाणाऱ्या रस्त्यावर उघाडी बांधणे आवश्यक आहे. सदर नाल्यास दगडाने पिचिंग करणे तसेच नाल्याच्या रेषेत उघाडी बांधणे कामी रु. १६,५८,४००/- इतके अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत. सदर कामे तातडीने करणे आवश्यक आहे.

सदर कामी सन २००८-०९ वर्षाच्या ''नविन गटारे/नाले बांधकाम'' या लेखाशिर्षाखाली रु. ४,००,००,०००/- एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता व निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान अनुमोदन :- सौ. शानु गोहिल**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी सुचना मांडली ती खालीलप्रमाणे.**

सदर ठिकाणी सरकारी जागेवर पुर्वपार असलेला नैसर्गिक नाला मातीच्या भरावात बुजवला आहे. त्यावर मनपा नगररचना विभागाने इमारतीचे बांधकाम नकाशे मंजुर केले आहेत. मा. आयुक्तांनी या प्रकरणी पुर्णपणे चौकशी करुन कारवाई करावी या अटीशर्तीस अधीन राहून.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, निविदास मान्यता देणे.

**शरद पाटील :-**

साहेब, आपण आता कुंपण बांधायला निविदांची मंजुरी घेणार आहोत. कुंपण बांधताना आपली जी वादग्रस्त जागा तिथे आहे ती आपण सोडून दिली किंवा त्याचा काही विचार करणार आहोत.

**दिपक खांबित :-**

आपली ती जागा आहे. त्याप्रमाणे कुंपण भिंती बांधणार आहे.

**शरद पाटील :-**

ती वादग्रस्त जागा आहे तर त्याचे आपण करणार ते सांगा?

**दिपक खांबित :-**

सर्व्हे प्लॅन आपल्याकडे फायनल आलेले आहे. त्याप्रमाणे आपण करणार.

**शरद पाटील :-**

वादग्रस्त जागा आहे त्याच्यात घेवून बांधणार.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, परवा आम्ही तिकडे गेलेलो. तिथे पलिकडे आपले लायब्ररीसाठी रिझर्व्हेशन आहे. त्याच्यामध्ये टेंभा हॉस्पीटलच्या जागेमध्ये कोणीतरी अतिक्रमण केलेले आहे आणि तिथे भिंत बांधलेली आहे. त्याच्यावर आपण काय कारवाई केले. मी काल बघितले.

**शरद पाटील :-**

जी अतिक्रमण केले आणि भिंत बांधले ते तोडणार कधी?

**दिपक खांबित :-**

साहेब, आमचे स्वतःचे टेंडर झाले की, आम्ही दोन दिवसात तोडू.

**शरद पाटील :-**

साहेब, आपण हा ठेका देतो. श्री. साई गणेश कन्स्ट्रक्शन साडे तेरा टक्के कमी दराने आणि सागर इन्टरप्रायजेसला सोळा टक्के कमी दराने. मग त्याला आपण का नाही देत?

**दिपक खांबित :-**

साहेब, तिथे प्रिन्टीग मिस्टेक आहे. तिथे अबॉव्ह आहे.

**शरद पाटील :-**

जास्त दराने आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या गोषवाऱ्यामध्ये तक्त्यामधील मे. सागर एन्टरप्रायजेसचे कमी दराने शब्द आहे ना. तिथे जास्त दराने आहे.

**प्रशांत पालांडे :-**

खतगावकर साहेब, ह्याच्यामध्ये १४५ मी. अगोदर आपण भिंत बांधलेली. दोन पार्टमध्ये बांधली. १४५ मीटरची कुठल्या स्थायी समितीमध्ये मंजुर झाली होती. ते आम्हाला कळू शकते का?

**दिपक खांबित :-**

मंजुर झाले ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्थायी समिती दि. २७/३/२००८, प्रकरण क्र. ६७, १४५ चे जे आहे ना.

**प्रशांत पालांडे :-**

त्याच्यामध्ये उरलेला अंदाज आहे. मी विचारतो १४५ मीटरला कुठल्या स्थायी समितीने मंजुरी दिले?

**दिपक खांबित :-**

त्याच्या आधी झालेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मग, दाखवा ना.

**दिपक खांबित :-**

डिसेंबर किंवा जानेवारी मध्ये झाले.

**प्रशांत पालांडे :-**

तेव्हा हीच बॉडी होती का? ही बॉडी नसेल.

**दिपक खांबित :-**

हीच बॉडी होती.

**प्रशांत पालांडे :-**

चर्चा झालेली ती ह्या तारखेला दि. २४/०१/०८ ला चर्चा झाली.तेंव्हा आपण मंजूरी दिले.पण ही १४५ मि.ला कधी मंजूरी मिळेल.

**शरद पाटील :-**

१४५ मी.ची ही पहिली भिंत झाली होती.

**प्रशांत पालांडे :-**

आमची माहिती अशी आहे की,दगडीसाठी दिलेली आणि चेंज झालेली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हो एवढाच फरक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दि. ०५/०४/२००८ रोजीचा दै. लोकमत/दै. लोकनायक या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा सुचनेनूसार खालील कामाकरीता ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च / दर |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) टेंभा हॉस्पिटल आवारात सर्व्हे क्र. ७५९ ते ७७१ या जागेत उर्वरीत कुंपण भिंत बांधणे. | रू. ३७,५१,४२१/- |
| | | ५.०० % कमी दराने |
| | १) मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | **१३.५० % कमी दराने** |
| | **२) मे. श्री. साईगणेश कंन्स्ट्रक्शन** | १५.५० % जास्त दराने |
| | ३) मे. एम. एस. एन्टरप्रायजेस | २०.०० % जास्त दराने |
| | ४) मे. ॲनयडा एन्टरप्रायजेस | २५.०० % जास्त दराने |
| | ५) मे. बालाजी इन्फास्ट्रक्चर | ९.९० % कमी दराने |
| | ६) मे. ओम कंन्स्ट्रक्शन | ५.०० % कमी दराने |
| | ७) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ८.१३ % कमी दराने |
| | ८) मे. एम. एम. कंन्स्ट्रक्शन | ५.०० % कमी दराने |
| | ९) मे. ललित एन्टरप्रायजेस | १६.०० % जास्त दराने |
| | १०) मे. सागर एन्टरप्रायजेस | |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदाराने सादर केलेले सवार्त कमी दराची निविदा वाजवी आहे. तरी मे श्री. साईगणेश कंन्स्ट्रक्शन यांची १३.५०% कमी दराची निविदा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मंजूर करण्यात येत आहे. तसेच ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

**गणेश शेट्टी :-**

हया ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.सचिव पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १३ :-**

निविदास मान्यता देणे.

**ठराव क्र. १४ :-**

दि. ०५/०४/२००८ रोजीचा दै. लोकमत/दै. लोकनायक या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा सुचनेनूसार खालील कामाकरीता ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च / दर |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) टेंभा हॉस्पिटल आवारात सर्व्हे क्र. ७५९ ते ७७१ या जागेत उर्वरीत कुंपण भिंत बांधणे. | रू. ३७,५१,४२१/- |
| | | ५.०० % कमी दराने |
| | १) मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | **१३.५० % कमी दराने** |
| | **२) मे. श्री. साईगणेश कंन्स्ट्रक्शन** | १५.५० % जास्त दराने |
| | ३) मे. एम. एस. एन्टरप्रायजेस | २०.०० % जास्त दराने |
| | ४) मे. ॲनयडा एन्टरप्रायजेस | २५.०० % जास्त दराने |
| | ५) मे. बालाजी इन्फास्ट्रक्चर | ९.९० % कमी दराने |
| | ६) मे. ओम कंन्स्ट्रक्शन | ५.०० % कमी दराने |
| | ७) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ८.१३ % कमी दराने |
| | ८) मे. एम. एम. कंन्स्ट्रक्शन | ५.०० % कमी दराने |
| | ९) मे. ललित एन्टरप्रायजेस | १६.०० % जास्त दराने |
| | १०) मे. सागर एन्टरप्रायजेस | |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदाराने सादर केलेले सवार्त कमी दराची निविदा वाजवी आहे. तरी मे श्री. साईगणेश कंन्स्ट्रक्शन यांची १३.५०% कमी दराची निविदा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मंजूर करण्यात येत आहे. तसेच ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे** **अनुमोदक :- श्री. गणेश शेट्टी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी, मि.भा.मनपा. यांचेकडील साप्ताहिक वर्द्यांचा तपशिल. (कालावधी दि. ३०/०३/२००८ ते दि. ०५/०४/२००८ व दि. ०६/०४/२००८ ते दि. १२/०४/२००८)

**एस. ए. खान :-**

साहेब, हयांच्यामध्ये मांणसाची सुटका करणे आणि केबलच्या मिटर बॉक्सला आग लागणे,मागे आमच्या मिरारोडच्या बॉक्सलाच आग लागली होती.तेंव्हा आम्ही फोन केला तर ते बोलतात की,रिलायन्स वाल्यांना फोन करा आणि येथे म्हणतात कि,विनय नगरला गेले होते.विनय नगर,प्लेजेंन्ट पार्कला मी फोन केला होता.तर ते म्हणतात की केबिनला आग लागली आहे तर रिलायन्सला फोन करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहरामध्ये कुठेही आणि कुठल्याही जागेला आग लागू ......

**शरद पाटील :-**

साहेब,शहरामध्ये नुसती आग लागली तरच.का.दुसरे काही जसे वन्य प्राणी झाले तर हयांचे काम आहे ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वन्य प्राणीसाठी नाही.

**एस. ए. खान :-**

तुम्ही येथे मिटर बॉक्स आग लागलेली आहे तुम्ही लिहिलेले आहे ना.तर मि मिटर बॉक्सला आग लागलेली सांगतो.

**शरद पाटील :-**

सोहब, वाघ वैगेरे प्राणी आले तर कोणाला बोलवायचे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मु अग्निशमन अधिकारी हयांनी कुठलेही कॉल आले तर ते अटेन्ड करायचे आणि रिलायन्सला कळवायचे.

(सदरचा विषय मा. स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १५, महापौर चषकाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**शानू गोहिल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दरवर्षी महापौर चषकाचे आयोजन करण्यात येते. सदर महापौर चषकांतर्गत कुस्ती, कबड्डी, खो-खो, शुटींग बॉल, क्रिकेट, पावसाळ्यात मिनि मॅराथॉन इ. स्पर्धेचे आयोजन होत असते. त्याकरिता अर्थसंकल्पात शालेय क्रिडा स्पर्धा / सांस्कृतिक कार्यक्रम / मा. महापौर चषक / मॅराथॉन स्पर्धा या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लक्ष एवढी तरतुद केलेली आहे. तरी सदर तरतूदीमधून सन २००८-०९ या वर्षात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास, खर्चास व निविदा मागविणे, अग्रीम देण्यास तसेच इतर आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सर्व स्पर्धेचे आयोजनापूर्वी प्रशासनाने मा. महापौर यांच्याकडे बैठक घेउन स्पर्धेची रुपरेषा ठरविण्यात यावी.

**शरद पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ह्याच्यासाठी आपण कमिटी नेमुन ठराव करु या.

**मिलन म्हात्रे :-**

मा.सभापती साहेब,हयांचे रुलिंग व्यवस्थित दया.की कमिटीमध्ये अधिकारी कोण असतील स्थायी समितीचे मेंबर कोण कोण असतील.प्रत्येक पक्षाचा एक असेल किंवा कसे काय? किंवा पूर्ण कमिटी असेल,असे व्यवस्थित चांगले रुलिंग दया.म्हणजे अधिका-यांना अडचन नको यायला.

**एस. ए. खान :-**

मा.सभापती साहेब,माझी सूचना आहे की,महापालिकेची जी शाळा आहे.त्या सगळया विदयार्थ्यांना तिकडे बोलवायचे. पूर्ण मिरा भाईंदर ते.....
ठरावात तसे नाही.

**शानू गोहिलः-**

ठराव में ऐसा नही है.

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची जी शाळा आहे.आणि त्या विदयार्थ्यांना बोलवायचे.आपन आपल्या विदयार्थ्यांना बोलवायच्या.

**मा. सभापती :-**

सहा माणसांची कमिटी असणार आणि मि सातवा असणार टिम तुमची निवडून घ्या की, कोणाला सदस्य बनायचे आह.ती नावे आमच्याकडे दया.

**शरद पाटील :-**

मा.उपायुक्त साहेब,टोईंग टोचन आपल्या विभागाचे आहे.मला.जरा त्याचे उत्तर दयांना.

**एस. ए. खान :-**

टोईन टोचनचे मला पण सांगायचे आहे.टोचनची गाडी कोणाकडे आहे.

**शरद पाटील :-**

टोचनची गाडी आपल्या विभागात आहे का? महापालिकेत आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हो महापालिकेची आहे.

**शरद पाटील :-**

त्याचे डिपार्टमेंन्ट कोणाकडे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दोंदे साहेब,आपण मला म्हणालात की,आपल्याकडे टोचन नाही.

**संजय दोंदेः-**

साहेब,आपल्याकडे टोचन नाही.ते बंद केले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

टोचन गाडी आपन भाडयाने घेतो.

**शरद पाटील :-**

का बंद केले?

**संजय दोंदेः-**

त्याची मुदत संपले.

**शरद पाटील :-**

मुदत संपले तर ती कधी वाढवणार. जे वाढवायचे ते वाढवले नाही. नाही ते वाढवता. आणखीन दुसरा विषय आहे. आता हे अतिक्रमणवाले फेरिवाल्यांना उचलत होते. तर ते बंद झाले? आता आचारसंहिता संपली, इलेक्शन संपले, सगळं संपल. तर ते चालु करा आणि आता १५ तारखेपासून शाळा चालू होणार आहेत. परंतु, त्या प्रिन्सीपलची आणि पालकांची तक्रार जर आली ना तर आम्ही उपोषणाला बसणार, हे आम्ही तुम्हाला आजच्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये सांगतो. केबिन रोडला तीन शाळा आहेत आणि एवढे फेरिवाले असतात, शाळा सुटल्यावर एवढी गर्दी असते. जर पोलिस प्रोटेक्शन मिळत नसेल तर नगरपालिकेचे पोलिस मागवून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, भाईंदर वेस्टला जे टॉकीज आहे. मल्टीप्लेक्सचे ......

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

खतगावकर साहेब, आमच्या येथे पण फेरिवाले बसतात. तर त्यांच्यावर काही कारवाई करत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपली नोल साफसफाई पूर्ण होत आलेली आहे. आता आम्ही फेरिवाल्याच्या मागे लागु.

**शरद पाटील :-**

साहेब, नाले साफसफाई व्यवस्थित झालेली नाही.

**एस. ए. खान :-**

कायम मिरारोडला पाणी भरले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

भरतीचे पाणी भरतें का?

**एस. ए. खान :-**

भरतीचे पाणी नाही. पावसाचे पाणी होते. २० मिनिटामध्ये पाणी भरते. तरी पण तिकडचा कचरा उचलला नाही. तुम्ही पथक नेमा ना. काय झाले तर ताबडतोब बोलवू शकलो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

रात्रपाळीसाठी पथक नेमले आहे आणि तशी दक्षता घेण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या मल्टीप्लेक्स टॉकीजच्या समोर टू व्हिलर, रिक्षा, कारची एवढी गर्दी असते. आपल्या भाईंदर वेस्टला नगरपालिकेच्या इकडे येताना, त्या माणसाला आपण रितसर पार्कींगची जागा आपण पार्कींग केले. टॉकीजच्या खाली पार्कींग आहे. टू व्हिलरसाठी त्यांनी तिकडे सेप्रेट जागा केली. पण ह्या सगळ्या गाड्या रस्त्यावर का? आता एका रस्त्यावर तीन-चार टू व्हिलर पडल्या होत्या. पेट्रोल सांडले होते. आता कोणी बिडी काडी टाकली, स्फोट झाला, ठाण्याला तो प्रकार व्हायचा. म्हणजे ह्याच्यावर कोणाचे कंट्रोल आहे का? साहेब, तिथे खाली पार्कींग आहे. पार्कींगला हे लोक टू व्हिलरला अलाउड नाही करत. आतला एक रस्ता आहे. तिकडे परत मोकळे आहे. तिकडे शो रुम आहे. म्हणून तिकडे पार्कींग करुन देत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

रस्त्यावर जे पार्कींग होते त्यांचे ओन पार्कींग आहे. त्याच्यात पार्कींग न करता ते रस्त्यावर पार्कींग करतात. आपण एकदा जावून त्या मॅनेजरशी हे करुन ……

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही अतिक्रमणच्या गाडीवरुन टू व्हिलर उचलाना.

**शरद पाटील :-**

साहेब, शिवाजी महाराज मार्गावर सगळ्या गाड्या लागतात.

**संजय दोंदे :-**

हातगाड्या आपण सगळ्या तिकडच्या उचलल्या.

**मिलन म्हात्रे :-**

हातगाडी नको. प्रत्येक वेळी हातगाडी बोलता. तुम्ही टू व्हिलर, रिक्षा, कार सगळं उचला मग कळेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

पार्कींगचा विषय पानपट्टे साहेबांनी आणला होता. पण तो नाही झाला.

**मिलन म्हात्रे :-**

पार्कींग दिले आणि आपण वनवे पण डिक्लेअर केलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, नो पार्कींग, नो पार्कींगचे बोर्ड लावायचे आहे तर ते आणा. ६०-६० फुटाचे रोड करायचे आणि त्याच्यावर गाड्या आणि फेरिवाले सगळे बसतात. तो विषय पुढच्या मिटींगला टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, संगणक चालक आणि लघूलेखक यांची ह्या महिन्यात मुदत संपली आहे. त्यांचा तुम्ही प्रस्ताव घेवून या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

ह्याच्यामध्ये काय झाले की, मुदतवाढीचा प्रस्ताव आम्ही ह्या स्थायी समितीला देतो. पण, मा. महासभेने त्याच्यामध्ये समिती नेमली आहे ना. तोपर्यंत मा. महासभेने त्याला मुदतवाढ दिलेली आहे ना. सचिव साहेब ठराव काय आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दि. ३०/०६/२००८ पर्यंत मुदत दिली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

३० जून पर्यंत. मग आपण एक विषय घेवून येतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे. विषय घेवून या.

**शरद पाटील :-**

साहेब, छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर परत फेरिवाले बसायला लागले. साहेब, काय आहे. शेवटी ही जबाबदारी आपली आहे. जेव्हा आम्ही तक्रार करणार तेव्हाच उचलणार का? किती तुमचे ऑफीसर त्या रोडने येतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

मी तुम्हाला सांगातो, फेरिवाल्यांसाठी आपण विशेष ड्राईव्ह घेतली.

**शरद पाटील :-**

मी छत्रपती शिवाजी महाराज मार्गाचे बोलतो. बाकीचे विषय सोडून द्या. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर हे आपली शान बोलतो. लोक येतात ते शान बोलतात. आम्ही सांगणार तेव्हाच उचलणार का? तिथून किती ऑफीसर जातात, किती ऑफीसर येतात.

**मिलन म्हात्रे :-**

त्या अतिक्रमण विभागाचा उपायुक्तच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

दोन-तीन दिवसात आपल्याला लिखित देवू. ऐकून घ्या सध्या आपण सर्व नालेसफाईमध्ये फिरतो. आपण हायवेचा एवढा मोठा ड्राईव्ह घेतला. मागे दोन दिवसा खाली. छत्रपती शिवाजी महाराजचा घेवू. आपल्याला काही प्रॉब्लम नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, ह्यानंतर आम्ही तुम्हाला हे पत्र दिलेले आहे. एक नारळाच्या झाडाबाबत आणि एक माती भराव बाबत. ह्या दोन विषयावर मी पत्र दिलेली आहेत. नारळाचे झाडं २५०० लावलेली आहे. असे वृक्ष प्राधिकरण समितीने दिलेले आहे. ती सर्व खोटी बाब आहे. हा पुढच्या मिटींगमध्ये विषय आला पाहिजे.

**मा. सभापती :-**

मी सर्व सदस्यांना विनंती करतो की, आपल्याला कमिशनर साहेबांनी एक लेटर दिलेले आहे. मा. उपायुक्त साहेब आणि पानपट्टे साहेबांनी सुध्दा पत्र दिलेले आहे. नाले सफाईची सर्व कामे झालेली आहेत. आपल्या सगळ्यांना पाहणी करायला जायचे असेल तर आपण उद्या ठरवून जावू या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

काम प्रगती पथावर आहे. पाहणी करण्यासाठी तुम्हाला पत्र दिलेले आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

महापौर चषकाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दरवर्षी महापौर चषकाचे आयोजन करण्यात येते. सदर महापौर चषकांतर्गत कुस्ती, कबड्डी, खो-खो, शुटींग बॉल, क्रिकेट, पावसाळ्यात मिनि मॅराथॉन इ. स्पर्धेचे आयोजन होत असते. त्याकरिता अर्थसंकल्पात शालेय क्रिडा स्पर्धा / सांस्कृतिक कार्यक्रम / मा. महापौर चषक / मॅराथॉन स्पर्धा या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लक्ष एवढी तरतुद केलेली आहे. तरी सदर तरतूदीमधून सन २००८-०९ या वर्षात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास, खर्चास व निविदा मागविणे, अग्रीम देण्यास तसेच इतर आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सर्व स्पर्धेचे आयोजनापूर्वी प्रशासनाने मा. महापौर यांच्याकडे बैठक घेउन स्पर्धेची रुपरेषा ठरविण्यात यावी.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आपण सगळे सदस्य जावून बघून येवू या. कधी जायचे तसे मला सांगा. उद्या किंवा परवा जावू या. तसेच आजची सभा ही सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, उपायुक्त, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली त्याबद्दल धन्यवाद आणि आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी २.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**